साठवणीतील गाणी

# नवरसांचा जादूगार मोहम्मद रफी

डॉ. मृदुला दाढे




राजहंस प्रकाशन

साठवणीतील गाणी

नवरसांचा जादूगार मोहम्मद रफी

डॉ. मृदुला दाढे

संपादक : शिरीष सहस्त्रबुद्धे

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन प्रा. लि.
१०२५, सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०
फोन : (०२०) २४४७३४५९
E-mail : rajhansprakashan1@gmail.com
Website : www.rajhansprakashan.com

© मुखपृष्ठ, अंतर्गत मांडणी,
निर्मितिसंलग्न बाबी :
राजहंस प्रकाशन प्रा. लि.

मुद्रक
श्रीकृष्ण आर्ट्स
५००/१ जोशी संकुल,
शॉप नंबर ३, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

Navrasancha Jadugaar Moh. Rafi

Dr. Mrudula Dadhe

© संहिता : मृदुला दाढे

mruduladadhe@gmail.com
www.mruduladadhe.com
७०२१४४१८१०

विशेष सहकार्य : सुहास किर्लोस्कर
सुश्रुत कुलकर्णी

मुखपृष्ठ : तृप्ती देशपांडे

सुलेखन : बाबू उडुपी

निर्मिती साहाय्य : वैशाली जोशी

अक्षरजुळणी :
इंकब्लूम मीडिया (ओपीसी) प्रा. लि.
फोन : ७९७२८२९१६५

मुद्रितशोधन : शुभांगी भिडे

आवृत्ती पहिली : नोव्हेंबर २०२४

राजहंस क्र. K-01-2024(1182)

ISBN : 978-81-19625-65-9

किंमत : रु. २००/-

आपली आई जे काम करते, त्याचा कायम अभिमान बाळगून
माझ्यामागे खंबीरपणे उभं राहणाऱ्या
चि. डॉ. रमणी (MBBS, MS Biotech, U.S)
आणि चि. ऋत्विज (व्यवस्थापन-कौशल्य, जपानी भाषातज्ज्ञ, टोकियो)
या माझ्या अत्यंत संवेदनशील, बुद्धिमान मुलांना
ही साहित्यकृती भेट.

- आई

आठवणीतील गाणी, मनात साठवणीसाठी...

हिंदी चित्रपटसंगीतातली चार लखलखती नक्षत्रे

**आवाजाचा अवलिया - किशोर कुमार**

**नवरसांचा जादूगार - मोहम्मद रफी**

**चिरतरुण स्वर - आशा भोसले**

**सुरांची सम्राज्ञी - लता मंगेशकर**

यातला प्रत्येक क्यूआर कोड तुम्हाला देईल
पंचवीस अप्रतिम गाण्यांचा नजराणा..!

# अनुक्रम


- एका दिव्य स्वराचा मागोवा घेताना... / ९
- असा रफी पुन्हा न होणे! / १३

१. ओ दूर के मुसाफिर / ३७

२. टूटे हुए ख़्वाबों ने हमको / ४०

३. हम बेखुदी में तुम को / ४३

४. हम और तुम और ये समा / ४६

५. अपनी तो हर आह इक तूफान है / ४९

६. चौदहवीं का चाँद हो / ५३

७. जाने क्या ढूँढती रहती हैं / ५७

८. ऐ गुलबदन, ऐ गुलबदन ! / ६०

९. जो बात तुझ में है / ६३

१०. याद न जाए बीते दिनों की / ६६

११. ऐ हुस्न जरा जाग तुझे / ६९

१२. पास बैठो तबीयत बहल जाएगी / ७३

१३. रंग और नूर की बारात / ७६

१४. है दुनिया उसी की, ज़माना उसी का / ७९

१५. न झटको ज़ुल्फ से पानी / ८२

१६. सुबह न आयी, शाम न आयी / ८५

१७. मन रे तू काहे ना धीर धरे.. / ८९

१८. दिल जो न कह सका / ९२

१९. जाग दिले दीवाना रुत जागी / ९६

२०. यहाँ मैं अजनबी हूँ / ९९

२१. तुम ने मुझे देखा होकर मेहरबाँ / १०२

२२. आप के हसीन रुख पे / १०५

२३. मेरे दुश्मन तू मेरी / १०९

२४. दिल की आवाज़ भी सुन / ११२

२५. कहीं एक मासूम नाज़ुकसी लड़की / ११५

परिचय / ११९

---

**आपली आवड**

प्रिय वाचक,

या २५ गाण्यांची निवड लेखिकांनी केलीय. त्या चित्रसंगीताच्या ख्यातनाम जाणकार आहेत. त्यांची निवड छानच आहे. पण तुमच्या आवडीची काही गाणी वेगळीही असू शकतील. 'या पुस्तकात ही गाणी हवीच होती!' असंही तुम्हाला वाटेल. तर वाचकांनी यातल्या कुठल्याही तीन गाण्यांऐवजी स्वत:च्या आवडीची तीन गाणी निवडावीत, आणि तीच का निवडली हे आम्हाला २०० शब्दांत लिहून खाली दिलेल्या ई-मेलवर पाठवावं. तीन सर्वोत्तम लेखांना 'ग्रंथवेध'मध्ये प्रसिद्धी आणि राजहंसतर्फे ग्रंथभेट देण्यात येईल.

ई-मेल : rajhansgranthvedh@gmail.com

---

# एका दिव्य स्वराचा मागोवा घेताना...

मोहम्मद रफी हे माझ्या वडिलांचं दैवत. त्यामुळे या शापित गंधर्वाचा स्वर माझ्या कानावर पडला तो अगदी लहानपणापासून. घरात रेकॉर्डप्लेयर होताच. माझे वडील म्हणजे डॉ. प्रफुल्ल दाढे आणि आई सुचेता, ही दोघंही संगीतवेडी. सुवर्णकाळातलं संगीत, त्यांच्यामुळेच माझ्या आयुष्यात आलं. त्यातही रफीसाहेब हे श्रद्धास्थान. त्यांची गाणी घरात सतत ऐकली, गायली जात असत. त्यामुळे रफीसाहेब हे जगण्याचा एक अविभाज्य भागच झाले. काही व्यक्ती, साहित्यकृती, चित्रपट, गाणी आपल्यात इतके भिनलेले असतात की त्यांच्याशिवाय अस्तित्व, ही कल्पनाच आपल्याला सहन होत नाही. रफीजी त्यांच्या अनेक गाण्यांतून पुन्हा पुन्हा कानांना सुखावत राहिले, मनाचे लाड पुरवत राहिले!

हिंदी चित्रपटसंगीत हा माझ्या अभ्यासाचा, संशोधनाचा विषय. संगीतकारांच्या योगदानावरचा माझ्या प्रबंध हे निमित्त ठरलं आणि अनमोल रत्नांनी भरलेला खजिनाच हाती गवसला. डोळे दिपून गेले. चित्रपटगीत म्हणजे अनेक सृजनशील मनं एकत्र येऊन निर्माण झालेला प्रतिभेचा सामूहिक आविष्कार असतो. त्यात गायक हा घटक म्हणजे त्या काव्याला, चालीला आणि चित्रपटातल्या भूमिकेला न्याय देणारं माध्यम आहे हे अभ्यासात आलं. गायकाला चाल ज्या स्वरूपात शिकवली जाते, ती तशीच्या तशी फक्त आत्मसात करून भागत नाही, तर त्यात स्वत:ची काही उपज (improvisation) असावी लागते. ऐनवेळी सुचलेली एखादी मुरकी, हरकत किंवा एखादा विराम.. त्या ओळीला खूप उंचीवर नेऊ शकतो. हे करू शकणारे गायक-गायिकाच या क्षेत्रात अधिराज्य गाजवू शकतात.

पडद्यावर दिसणारा अभिनेता. त्याची देहबोली, त्या भूमिकेचा स्वभाव.. जो अबोल, बोलका, शांत, अंतर्मुख, दंगामस्ती करणारा, मिश्कील, हळुवार, दुखावलेला, वैफल्यग्रस्त.. यांपैकी कसाही असू शकतो. पण यातल्या प्रत्येक

भावछटेला अनंत उपछटासुद्धा आहेतच की. प्रणय कधी अबोल असतो, तर कधी धीट, कधी तरल हळवा तर कधी मादक..! दु:खसुद्धा अनेक पातळ्यांचं असू शकतं. 'पार्श्वगायन' हा शब्द घासून गुळगुळीत झालाय, पण त्याचा खरा अर्थ अभिनयाशी निगडित आहे. ते केवळ त्या नायकाला आवाज उसना देणं नसतं, तर त्याहीपलीकडे बरंच काही असतं. रफीसाहेबांची गायकी ऐकताना जाणवतं, की त्यांच्या गाण्याला 'पार्श्वअभिनय' करण्याचा प्रयत्न नायकानं केला असावा अशी परिस्थिती कैक गाण्यांत आहे! ज्या भावछटा नायकालाही समजल्या नसतील, त्या रफीसाहेबांनी गाण्यांतून दाखवल्या आहेत.

रफीसाहेबांवर याआधी लेखन झालं नाही का? एवढ्या मोठ्या लोकोत्तर गायकाबद्दल खास वेगळी सांगण्यासारखी गोष्ट माझ्याकडे आहे का? तरंच या लेखनाला अर्थ आहे असं स्वत:ला बजावत, या गायनाकडे मी एका संशोधकाच्या नजरेतून पाहिलं. गाण्यांचं विश्लेषण सोप्या भाषेत करता आलं, तर ते सामान्य वाचकांना लवकर समजतं, हा अनुभव मी माझ्या कार्यक्रमांतून अनेकदा घेतला होता. गाण्यांचं 'विश्लेषण' करावं, ते 'विच्छेदन' होऊ नये ही काळजी घेणं महत्त्वाचं होतं. गायकी समजून घेताना, आवाजाचा लगाव जाणून घेताना, मी स्वत: एक गायिका असल्याचा मला नक्कीच फायदा झाला.

रफीसाहेबांवर दैनिक पुण्यनगरीसाठी सदर लिहिणं हा प्रवास फार सुंदर होता. काही वेळा मग त्या एका गाण्याची योजना कशी, कुठे, कुणासाठी झाली, कथेतला संदर्भ काय होता हे जाणून घेण्यासाठी संपूर्ण चित्रपट बघावा लागे. एकेका शब्दाचा अर्थ शोधून काढून, संदर्भानुसार कुठली अर्थछटा त्यात मिसळली गेली आहे का, हा विचार करावा लागे. असं करता करता अनेक उत्तमोत्तम गाणी अभ्यासता आली. अनेकदा आपण गाणं फार सहज, वरवर ऐकतो. एक वेळ त्याची चाल पटकन गुणगुणता येते, परंतु काव्य मात्र तितकंसं गांभीर्यानं ऐकलं जात नाही. त्यातले सूचक अर्थ आणि अव्यक्त भावछटा आपल्यापर्यंत भिडत नाहीत. यामुळे किती मोठ्या आनंदाला आपण मुकतो! एक एक गाणं सर्वांगानं आस्वादणं, हा एक प्रचंड मोठा आनंद आहे. या लेखनाद्वारे हा आनंद सामान्य श्रोत्यांना देण्याचा हा प्रयत्न आहे.

हजारो गाण्यांमधून पंचवीस गाणी निवडणं हे खरोखर आव्हान होतं. शक्यतो मूडचं वैविध्य राखता येईल अशी काळजी घेतली आहे. खासकरून चित्रगुप्त, सी. अर्जुन, इकबाल कुरेशी, उषा खन्ना यांच्यासारख्या कमी चर्चिल्या जाणाऱ्या संगीतकारांचीही आठवण ठेवली. प्रणयाचे रंग शोधले आणि दु:खाच्याही अनेक गहिऱ्या छटा धुंडाळल्या. गीतकारांमध्ये साहिर लुधियानवी,

शकील बदायुनी आहेत तसे शेवन रिझवी, एस. एच. बिहारीही आहेत. साधारणत: साठच्या दशकात रफीसाहेबांची अत्युत्तम गाणी सापडतात. त्यामुळे याच कालखंडातील गाणी आपोआप जास्त आली आहेत. संगीताचा पोत हळूहळू बदलत होता, काव्यातले - संगीतातले बदल रफीसाहेबांच्या आवाजात प्रतिबिंबित होणं स्वाभाविक होतं, आणि त्यांचाही मागोवा घेता यावा म्हणून गाण्यांचा क्रम काळानुसार (chronologically) लावला आहे.

रफीसाहेबांची अनेक गाणी या लेखनात अंतर्भूत करता आली नाहीत, याचा मला खेद आहे. तुमचं अत्यंत आवडतं गाणं यात आलं नसेल, तर त्यासाठी मी क्षमस्व म्हणते! या पंचवीस निवडक गाण्यांइतकीच अनेक सुंदर गाणी बसल्या बैठकीत काढता येतील. अमुक गाणं का घेतलं आणि अमुक का नाही या प्रश्नाला उत्तर नाही; परंतु एक नक्की की गाण्यांची संख्या महत्त्वाची नाही, रफीसाहेबांच्या गायकीत सापडलेली सौंदर्यतत्त्वं महत्त्वाची आहेत; जी तुम्ही त्यांच्या हजारो गाण्यांत अनुभवू शकता, त्यांचा आस्वाद आणि आनंद घेऊ शकता. हेच या लेखनातून अपेक्षित आहे. या गाण्यांच्या निमित्तानं हाती लागलेली वैशिष्ट्यं, उदा. त्यांनी घेतलेला विराम, आवाजाचं मॉड्युलेशन तुम्हाला तुमच्या दुसऱ्या आवडत्या गाण्यांत शोधता आली, तर माझ्यासाठी ती अत्यंत आनंदाची गोष्ट असेल. अनेकदा पहाटे लेखन करत असताना, रफीसाहेबांचं गाणं एकाग्र चित्तानं कानांत साठवून घेत असताना, एखादी जागा किंवा एखादा सूर ऐकून काळीज लक्कन् हलल्याचा भास होई. अंगावर रोमांच उभे राहत. डोळे भरून येत. एक आवंढा गिळून मी पुढे लिहायला सुरुवात करत असे. काही वर्षांपूर्वी साक्षात रफीसाहेबांच्या घरी त्यांच्या तंबोऱ्याला स्पर्श करताना हाच अनुभव घेतला होता. कदाचित माझ्या हातून हे लेखन व्हावं, यासाठी रफीसाहेबांनी तेव्हाच आशीर्वाद दिले असावेत. ही गाणी ऐकत, हे लेखन वाचताना असा अनुभव वाचकांनाही आला तर मला धन्यता वाटेल.

या लेखनासाठी गाणी निवडताना, मला ज्यांची खूप मदत झाली ते माझे आईवडील, माझा भाऊ डॉ. प्रसाद दाढे, बहीण सौ. श्रिया परळीकर, असंख्य वाचक यांचं ऋण माझ्यावर आहे. आणि ते कायम राहील. मला हवे ते संदर्भग्रंथ तातडीनं उपलब्ध करून देणारे माझे सहकारी श्री. उदय मठकर यांचा मी आवर्जून उल्लेख करेन. माझे अनेक कार्यक्रम, बाहेरगावचे दौरे, व्याख्यानं, कार्यशाळा यांचं आयोजन आणि आमच्या एम. डी. प्रॉडक्शन्सचा वाढता व्याप एकहाती सांभाळून त्यांनी मला लिखाणाला मोकळीक दिल्यामुळे मला हे लिखाण मनासारखं करता आलं. जिथे मी संगीत विषयाचं अध्यापन करते, त्या आमच्या मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाचे प्रमुख डॉ. कुणाल इंगळे

सर आणि इतर प्राध्यापक स्नेही आणि हेमंत जुवेकर, जयश्री बोकील यांचं मला नेहमीच सहकार्य लाभत असतं. या सर्वांचे आभार मानणं त्यांना आवडणार नाही, तरीही कृतज्ञता व्यक्त करणं हे मी माझं कर्तव्य समजते.

हे लेखन अतिशय देखण्या स्वरूपात रफीसाहेबांच्या चाहत्यांपर्यंत पोचवणाऱ्या राजहंस प्रकाशनाचे मी मनापासून आभार मानते. श्री. दिलीप माजगावकर, डॉ. सदानंद बोरसे आणि हे पुस्तक दर्जेदार होण्यासाठी त्यावर काळजीपूर्वक संपादकीय संस्कार करणारे श्री. शिरीष सहस्त्रबुद्धे या अतिशय अनुभवी, जाणकार व्यक्तींचे आभार मानणं आनंदाचं ठरेल. माझ्या लेखनावर ही 'राज(हंस)मुद्रा' उमटते आहे, हा आनंद खूप मोठा आहे. या पुस्तकाचं मुखपृष्ठ, छायाचित्र संकलन, मांडणी, सजावट, मुद्रितशोधन आदी इतर अनेक तांत्रिक बाबींची जबाबदारी उचलणाऱ्या राजहंसच्या सर्वश्री शिरीष शेवाळकर, तृप्ती देशपांडे, वैशाली जोशी या टीमचंही कौतुक!

मला जो अनुपम आनंद मिळाला, तो मी जोपर्यंत रसिकांच्या हाती सोपवत नाही; तोपर्यंत ते देणं फिटत नाही, ही माझी धारणा आहे. हे पुस्तक म्हणजे 'गाणं समजून ऐकावं' म्हणून जी चळवळ मी हाती घेतली आहे, तिचा पुढचा आणि महत्त्वाचा टप्पा आहे. या माझ्या प्रयत्नांना रसिक वाचक साथ देतील आणि ज्यांना चित्रपटसंगीतात रुची आहे, संशोधन करायचं आहे, अशा विद्यार्थ्यांना व नवोदित गायकांनाही हे लेखन उपयुक्त ठरेल, अशी आशा व्यक्त करते.

कृष्णार्पणमस्तु !

**डॉ. मृदुला दाढे**

# असा रफी पुन्हा न होणे!

तो होता एक फरिश्ता! लहान मुलाचं नितळ, निरागस मन घेऊन आलेला! ईर्षा, हेवा अशा विकारांचा कणभरही स्पर्श त्या आरसपानी मनाला कधी झालाच नाही. सूर आणि मन यांचा अतिशय जवळचा संबंध असतो. त्यामुळे अशा मनातून आलेला सूरही विकाररहितच होता. फक्त कलेच्या जोरावर किंवा तयारीवर करोडो मनांवर अविरत वर्षानुवर्षं राज्य करणं शक्य नसतं. त्यासाठी गायकाच्या अस्तित्वालाच एक दैवी स्पर्श व्हावा लागतो. पण ज्यांना केवळ असा स्पर्श झाला नव्हता, तर ते स्वत:च देवत्वाजवळ पोचलेले होते; असे गायक म्हणजे मोहम्मद रफीसाहेब! ज्या कलाकारांच्या कारकीर्दीला कालमापनाची कसोटीच लावता येत नाही, असे रफी! पंचावन्न वर्षांचंच आयुष्य लाभलं त्यांना. जेमतेम चाळीस वर्षांच्या कारकीर्दीत अतिप्रचंड, दर्जेदार आणि काळाला पुरून मागे उरेल असं काम ते करून गेले.

पुरुषमनाचं नितांतसुंदर व्यक्त होणं, म्हणजे रफी.

हळवा आहे हा पुरुष. त्याचा अनुराग अतिशय कोमल आहे! प्रेयसीचा लडिवाळ अनुनय करणारा, तिच्या प्रेमात चिंब भिजून तिच्यातलं प्रेम जागवणारा आहे. पण वंचना झाल्यावर सात्त्विक संतापानं जाब विचारणारासुद्धा आवाज हाच आहे. तेव्हा त्या आवाजात कमालीचा उद्वेग असतो.. शब्दांना धार असते.. पण त्याचा स्थायिभाव हा अनुरागीच आहे. 'रफी-आवाज' हा मुळात प्रियकराचाच आवाज आहे. अगदी भक्तिगीत गातानाही 'प्रेम' हाच रंग आवाजात असतो, असं भासतं. सुरापासून कणभरसुद्धा न ढळणारा हा आवाज आहे. मधाळ अनुराग म्हणजे रफी! सुरेलपणाची परमावधी म्हणजे रफी. या आवाजाबद्दल लिहायचं तर त्याची जडणघडण, संगीतकारांनी त्याच्या गायकीवर केलेले संस्कार,

अनेक अभिनेत्यांना दिलेला चपखल आवाज, गायकीची मर्मस्थानं यांचा सविस्तर धांडोळा घेणं आवश्यक आहे.

मोहम्मद रफी या आवाजाला खुदानं जमिनीवर सामान्य लोकांच्या दु:खावर फुंकर मारण्यासाठी देहरूप घेऊन पाठवलं, तो दिवस होता २४ डिसेंबर १९२४. अल्लारखी आणि हाजी अली मोहम्मद यांचं हे पुत्ररत्न, कोटला सुलतानपूर (अमृतसर) इथे जन्माला आलं. घरात संगीताची पार्श्वभूमी नव्हती, आणि वडील तर संगीताला विरोध करणारे! रफी हे शेंडेफळ. लाडाचं नाव फीको. सर्वांत मोठा भाऊ हमीद, हा मात्र कायम रफीला साथ देत आला. त्याचा भक्कम पाठिंबा नेहमी मिळत राहिला. पण मग रफीसाहेबांच्या आयुष्यात 'गाणं' नेमकं प्रवेशलं कुठे नि कसं? तर एक फकीर एकतारा हातात घेऊन गात गात घरावरून जात असे. 'खेदन के दिन चार' हे गाणं गात तो फिरे. लहानगा रफी त्याच्या मागे मागे जाई.. त्याचं गाणं झाडाखाली बसून एकाग्र चित्तानं ऐके. त्या फकिरानं एकदा त्याला विचारलंही. त्यावर 'मला तुमचं गाणं आवडतं!' असं लहानगा रफी उद्गारल्यावर, काही ओळी त्यानं शिकवल्यादेखील. कदाचित त्या फकिराच्या गाण्यातला दैवी अंश रफीसाहेबांच्या गळ्यात उतरला असावा! स्वत:साठी गाणं आणि परमेश्वरासाठी गाणं यांतला फरक तिथेच त्याच्या अंतर्मनानं जाणला असावा. त्या फकिरानं या गंधर्वाला जन्मभर पुरतील एवढ्या दुवा नक्कीच दिल्या असतील.

रफी १४ वर्षांचा असताना त्यांचं कुटुंब लाहोरला स्थलांतरित झालं. इथे उस्ताद वाहिद अली खानसाहेब, उस्ताद बरकत अली खानसाहेब, पंडित जीवनलाल मट्टू, फिरोज निजामी यांच्याकडे शास्त्रीय गायन शिकता आलं. याच सुमारास एका कार्यक्रमात कुंदनलाल सैगल गाणार होते. पण वीज गेली आणि त्यांनी गायला नकार दिला. अशातच रफीच्या मित्रानं आयोजकांना विनंती केली, की वीज येईपर्यंत या मुलाला गाऊ दे! हाच तो महत्त्वाचा, आयुष्याला कलाटणी देणारा क्षण! संगीतक्षेत्रावर उपकार आहेत या मित्राचे! श्यामसुंदर या संगीतकाराच्या जाणकार कानांवर हा आवाज पडला.. (हो, तेच श्यामसुंदर ज्यांनी 'साजन की गलियाँ छोड़ चले' हे नितांतसुंदर गाणं दिलंय) आणि त्यांच्या चित्रपटात गाण्याची संधी दिली. हा चित्रपट पंजाबी होता, 'गुल बलोच' आणि साल होतं १९४२. फिरोज निजामी यांनी हे गाणं ऐकून लाहोर आकाशवाणीवर गाण्याची संधी दिली. त्यानंतर रफीसाहेबांनी मोठ्या भावासोबत १९४४ साली मुंबई गाठली. असं सांगतात, की मुंबईत उदरनिर्वाहाची खात्री नसल्यानं चण्यांची पोती घेऊन ही भावंडं आली होती. कित्येकदा चणे खाऊनच गुजारा करत असत. भेंडीबाजारात, अगदी १०×१२च्या खोलीत ही भावंडं

राहिली आणि त्यांनी काम शोधायला सुरुवात केली. हमीदभाई अनेक खेटे घालून भावाला कुठे संधी मिळते का ते बघत असत. कवी तनवीर नकवी यांच्याशी ओळख होती. नकवींनी या भावंडांची ओळख कारदार, मेहबूब मिया यांच्याशी करून दिली. हळूहळू दारं किलकिली होत होती. नौशादसाहेबांच्या वडिलांनी दिलेलं एक शिफारसपत्र होतं हातात. ते नौशादमियांना दाखवल्यावर त्यांनी काही गाण्यांमध्ये रफीला सामील करून घेतलं. बरं रफीचा स्वभाव इतका प्रामाणिक, की बसच्या भाड्याचे पैसे नाहीत म्हणून स्टुडिओतच थांबायची तयारी होती त्याची.. काम झाल्याशिवाय पैसे कसे मागायचे, म्हणून संकोचानं तो नौशादसाहेबांनाही पैसे मागत नसे. इथे रफीचा हा निष्पाप स्वभाव त्यांनाही प्रथम जाणवला असावा. यानंतर, ए. आर. कारदार यांच्या 'पहले आप' (१९४४) या चित्रपटात जी. एम. दुराणी, मोतीराम यांच्यासह एक गाणं म्हणण्याची संधी नौशादजींनी दिली. ('हिंदुस्तान के हम हैं').

हिंदी चित्रपटात रफीला स्वतंत्रपणे गाण्याची संधी पुन्हा श्यामसुंदर यांनीच दिली. 'गांव की गोरी' (१९४५) या चित्रपटात जी. एम. दुराणी यांच्यासह रफीनं 'अजी दिल हो काबू में' हे द्वंद्वगीत गायलं. नंतर फिरोज निजामी यांनी नूरजहांबरोबर 'यहाँ बदला वफ़ा का' हे गाणं गाऊन घेतलं आणि ते उत्तम गाजलं! नंतर सी. रामचंद्र यांनी दिलेलं, 'कहके भी न आये तुम' हे स्वतंत्ररीत्या गायलेलं पहिलं गाणं.

आता रफीसाहेबांना हळूहळू ही दुनिया ओळखायला तरी लागली. भेंडीबाजारमधल्या त्या चिमुकल्या जागेतच संसारही थाटला त्यांनी. रफीची स्पर्धा होती ती दुराणी, श्याम, सुरेन्द्र अशा गायकांशी. गुणवत्तेत रफी या सर्वांपेक्षा कैक योजनं पुढे होता, पण यशाची चव खऱ्या अर्थानं 'बैजू बावरा'नंतर चाखायला मिळाली. तत्पूर्वी, 'ये ज़िंदगी के मेले', 'सुहानी रात ढल चुकी' अशी नौशादसाहेबांची गाणी, 'अकेले में वो घबराते तो होंगे' हे खय्यामसाहेबांचं गाणं यांतून तरुण रफी स्वत:च्या आवाजाच्या शक्यता अजमावत होता. संगीतकारांनाही हे प्रकरण वेगळं असल्याची जाणीव होऊ लागली होती. 'बैजू बावरा' हा चित्रपट आला. नौशादसाहेबांनी 'ओ दुनिया के रखवाले', 'मन तरपत हरी दर्शन', 'तू गंगा की मौज' अशा गाण्यांमधून खरा रफी समोर आणला. आणि लोकमान्यता, फिल्मफेअर पुरस्कार, सगळंच लाभलं त्या चित्रपटाला. यात नायक हाच प्रतिभावान गायक असल्यानं गळ्याच्या तयारीला फार महत्त्व होतं आणि रफीसाहेब त्या कसोटीला पुरेपूर उतरले. इथून पुढे त्यांनी मागे वळून बघितलंच नाही. त्यांच्या आवाजाचा उपयोग करून लोकप्रियता मिळवावी असं त्या काळात प्रत्येक संगीतकाराला वाटू लागलं

असेल, यात काही नवल नाही. कारण या गळ्याला मर्यादा नव्हत्या, आवाज मुलायम होता.. सूर सच्चा होता आणि भावनेत भिजून येत होता. त्या गाण्यात नुसती तंत्रशुद्धता नव्हती तर त्या पलीकडे जाणारी, ऐकणाऱ्याच्या काळजाला हात घालणारी एक आर्त पुकार होती.

**हा आवाज नेमका होता कसा?**

संगीताच्या परिभाषेत आवाजाला वजन, घुमारा असणं, बेस असणं हे पुरुष-आवाजाच्या सौंदर्याचे निकष आहेत. रफीसाहेबांचा आवाज अतिघनगंभीर नव्हता. थोडा पातळपणाकडे जाणारा होता. वेळप्रसंगी ते स्वत:च्या आवाजात बेस देऊ शकत होते, पण बेस असणं हा स्थायिभाव नव्हता. त्यांच्या आवाजाचं सर्वांत महत्त्वाचं बलस्थान होतं, ते म्हणजे त्याचा मुलायम पोत. 'रफी-आवाज' हा अस्सल रेशमी वस्त्रासारखा, एकाच वेळी तकाकी (luster) आणि मऊसूत स्पर्श घेऊन आला. त्यामुळे त्यांचा टोन संपूर्ण विश्वात अजोड मानला जातो. एखाद्या मऊ तेजस्वी रेशीमवस्त्रात नाजूकपणे ठेवलेले बेशकिमती हिरेमोती सहजपणे घरंगळत यावे, तसे रफीसाहेबांच्या मुखातून शब्द-सूर निघत. जणू त्या शब्दांना त्या रेशमाची भूल पडलेली असे. तथापि, केवळ मुलायम असणं पुरेसं नसतं. सच्चा सूर हा तितकाच महत्त्वाचा. किंबहुना, अनेक आवाज ऐकायला गोड वाटले तरी सुराला कच्चे असल्यावर त्यांतलं वरवरचं माधुर्य गळून पडतंच. रफीसाहेबांचा आवाज कमालीचा सुरेल! सूर इतका खरा, की वाद्यं त्यावर जुळवून घ्यावीत. असा सूर जन्मजात मिळतो खरा, पण तो घासूनपुसून लख्ख ठेवावा लागतो. रफी हे रियाजी गायक होते. त्यामुळे आवाजाला हुकमी सुरेलपणा होता. आवाज सुरात लागणं ही अंदाजपंचे कृती नव्हती, तर ती हमखास सिद्धी होती.. मेहनतीनं वश केलेली सिद्धी! बरं हा सूर सर्व गाण्यांत एकाच वजनानं होता का? अजिबात नाही. त्या सुरांचे किती तरी दर्जे ते वापरत असत. म्हणजे काय, तर सूर हा स्वत:भोवती एक क्षेत्र घेऊन येतो. त्यामुळेच स्वर कोमल, अतिकोमल अशी रूपं धारण करू शकतो. रागसंगीतात ज्याप्रमाणे रागानुरूप स्वरांचा दर्जा गाठण्यासाठी गायक धडपडतात, तसंच रफीसाहेबांच्या आवाजात एका स्वराची अनेक रूपं ऐकू येतात. हे त्यांनी जाणीवपूर्वक केलं की सहज झालं, हे सांगणं अशक्य आहे. आणि गरज आहे का त्याची? शेवटी सूर उमटतात ते आधी मनात आणि मग गळ्यात.. मनात असलेल्या त्या भावनेचं प्रतिबिंब स्वरांत उमटणार! त्यामुळे नकळतसुद्धा या श्रुती त्यांच्या आवाजात झळाळून जात असाव्यात. त्या स्वरांची मितीच वेगळी असते.

रफी-आवाजाचं तिसरं महत्त्वाचं वैशिष्ट्य, एक दिव्य गुण म्हणजे त्यांचा

अफाट पल्ला! मंद्र ते अतितार सप्तकात, गोडवा तसूभरही कमी न होता हा आवाज लीलया फिरू शकत होता. शब्दप्रधान गायकीत आवाज फक्त गोड असून चालत नाही, त्याचा पोत उत्तम असूनही भागत नाही; तर त्या आवाजातून शब्द किती नादमय उमटतात, हे जास्त महत्त्वाचं असतं. ही दुर्मीळ गोष्ट असते. अनेक शास्त्रीय गायक आपल्या कमावलेल्या आवाजातही उत्तम दर्जाचं भावसंगीत गाऊ शकत नाहीत, याचं कारण हेच असतं. रफीसाहेबांचा आवाज प्रत्येक गायकासाठी आदर्श आवाज होता.

आवाजाला असणारी विलक्षण फिरत हा आणखी एक अलंकार रफीसाहेबांच्या गळ्याला लाभला होता. फिरत जन्मजात घेऊन यावं लागतं हे खरंच, परंतु ती रियाजानं अधिक धारदार करता येते. रफीसाहेबांच्या फिरतीला 'अचाट 'हे एकमेव विशेषण आपण लावू शकतो. ज्याला फिरतीचं तंत्र समजलं किंवा स्वरावली समजली, त्याला ती विशिष्ट जागा गाता येते, नाही असं नाही; परंतु त्यातले प्रत्येक स्वर, सहस्वर, कणस्वर सहज उमटणं आणि त्यांचं स्वतंत्र अस्तित्व ओळखू येऊनही घट्ट रेशमी नक्षीप्रमाणे एकमेकांचं वेगळेपण जपत एकसंधपणाचा अनुभव देता येणं, यासाठी फक्त आणि फक्त रफी.. त्यांच्या आसपासही कुणी जाऊ शकत नाही, हे सत्य आहे. अनंत उदाहरणं देता येतील... आपल्याला काही समजायच्या आत एक विजेचा लोळ येऊन जावा आणि त्याची आठवण काढताना तो झळाळ केवळ कल्पनेत राहावा, असं काहीसं होतं अशा जागा ऐकल्यावर. बिकट, अनवट, नोटेशन काढण्याच्या पलीकडे असलेल्या ज्या जागा रफीसाहेबांच्या गळ्यातून गेल्या आहेत; त्यांतल्या एकेका जागेवर स्वतंत्र लेख होईल, असं ते काम आहे.. 'यही है तमन्ना तेरे घर के सामने मेरी जान जाये'मध्ये जायेवरची जागा असो.. किंवा 'ऊपरवाला जान कर अंजान है'मध्ये है वरची स्वरांची अनोखी थरथर असो.. 'अजहूं न आये बालमा'मध्ये 'और भी मोरा मन ललचाये'मध्ये 'मन' वरची तान असो, 'ये जुल्फ अगर खुल के बिखर जाये तो अच्छा'मध्ये 'अच्छा' वरची नाजूक लड असो किंवा 'कुछ और नहीं है जाम है ये'मध्ये त्या जामला हलकेच हिंदकळवणं..! नोटेशन काढून, त्या चमत्काराची व्याख्या करून त्याचा अपमान नाही करता येत.. आणि नोटेशन काढून करणार काय? काही गोष्टींची एकच आणि शेवटची आवृत्ती निघते.. पुन्हा त्या गोष्टी घडत नाहीतच!

### गाण्यातलं भाव-प्रकटीकरण

आवाजाचा पोत, सुरेलपणा, पल्ला आणि फिरत यानंतर ज्या एका गुणामुळे

रफीसाहेब पूर्ण विश्वात अजोड ठरतात, ते म्हणजे त्यांचं भाव-प्रकटीकरण. आजवर हे कुणाला समजलेलं नाही, की गाण्याची अचूक भावना ते कसे ओळखू शकत होते? मुळात गाण्यात सांगता येईल अशी 'एक' अचूक भावना असते का? किती छटा असतात मानवी मनाच्या! कल्पना करा, की अनंत गाणी गाणारा गायक एकच आहे, आणि भाव-भावना हजारो आहेत. असं प्रमाण असताना, प्रत्येक गाण्याला न्याय देण्यासाठी किती खोल समज आवश्यक असेल? किंबहुना त्या काव्यातून कदाचित कवीलाही जाणवल्या नसतील इतक्या भावछटा रफीसाहेब दाखवू शकत होते. एकच शब्द अनेक गाण्यांत जेव्हा येतो, तेव्हा त्या त्या गाण्याच्या मूडनुसार त्याचा उच्चार – वजन बदललं गेलं पाहिजे, हे भान त्यांच्याकडे होतं. 'तेरे नाम का दिवाना', 'दीवाना मुझसा नहीं', 'दीवाने का हाल तो पूछो', 'ये दिल दिवाना है', 'दिल तेरा दीवाना है सनम' यांतल्या 'दीवाना' या एकाच शब्दाच्या भावछटा प्रत्येक गाण्यात वेगळ्या आहेत. कधी मिश्कील, कधी प्रेमात चिंब भिजलेला, कधी गंभीर! गाण्यात येणारी 'पुकार' कधी एऽऽऽ, तर कधी ओऽऽऽऽ या अक्षरांत येते. यातसुद्धा बारकाईनं ऐकल्यास त्यांतले फरक लक्षात येतात. ऐ गुलबदन, ओ मेरे शाहे खुबा, आजा आजा मैं हूँ प्यार तेरा यांतल्या हाका वेगवेगळ्या आहेत.

गाणं जरी चार मिनिटांचं असलं, तरी संपूर्ण गाण्यात एक भूमिका सांभाळून ठेवणं सोपं नसतं. ज्याला अभिनयक्षेत्रात भूमिकेचं बेअरिंग म्हणतात, ते सांभाळणं पार्श्वगायनातही फार महत्त्वाचं असतं. धोका कुठे असतो, तर सामान्यत: गाणं सुरू असताना जिथे एखादी 'जागा' येते, तेवढाच तुकडा किंचित त्या भावनेपासून किंवा त्या प्रवाहापासून ढळलेला वाटू शकतो; कारण कुठलाही गायक अशा वेळी किंचित सावध होतो.. मोठा चढ किंवा वळण आल्यावर आपली चाल सावध होते, गाडीचा वेग मंदावतो तसंच! पण रफीसाहेबांच्या गायकीत इतकी सहजता आहे, की अशा अवघड जागा त्याच भावनेला किंचितही धक्का न लावता येऊन जातात. यात त्या जागेचं म्हणून स्वतंत्र सौंदर्य जपलेलं असतंच, पण ती त्या संपूर्ण गाण्यात विरघळून गेलेली असते. रफीसाहेब गाण्याच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत फक्त ती भावनाच जगले. मग वेडीवाकडी वळणं येवोत, बिकट हरकती येवोत; प्रत्येक अक्षर त्या भावनेत अंतर्बाह्य भिजूनच आलं.. असं कधीही झालं नाही, की शास्त्रोक्त गाणं आहे; इथे गळ्याची तयारी महत्त्वाची आहे, मग शब्दांना कमी महत्त्व दिलं तर कुठे बिघडलं? तिथेही भावनेची साथ सुटत नाही.. एखाद्याला फक्त गाण्यांतूनच व्यक्त होण्याची अट घातली, तर मनुष्य काय करेल? तशी वाटते मला रफीसाहेबांची गायकी.

किती प्रकारच्या नायकांना त्यांनी आवाज दिला? किती प्रकारच्या भावना जगले असतील ते?.. किती प्रकारचे प्रेमभंग?.. किती प्रकारच्या निराशा? अन् तरी का हा आवाज एकसुरी वाटला नाही कधी? 'याद ना जाये' आणि 'स्वप्न झरे फूल से' यांत वैफल्यच आहे ना? मग 'याद ना जाये' आतून गदगदून रडायला लावतं आणि 'स्वप्न झरे फूल से मीत चुभे शूल से' ऐकताना हंबरडा फोडावासा वाटतो. असं का? 'जो बात तुझ में है तेरी तसवीर में नहीं'मध्ये 'फिर एक बार सामने आ जाओ किसी तरह'मधला किसीऽऽऽऽ हा स्वर खेचतात, तेव्हा त्या प्रतीक्षेचा अंत बघितला गेलाय.. ती कधी एकदा डोळ्यांना दिसेल अशी अवस्था झालीय, हे सगळं त्यातून समजतं.. पण 'अभी ना जाओ छोड़कर'मधला प्रियकर निघालेल्या प्रेयसीला हाताला धरून थांबवणारा आहे.. अभीऽऽऽऽ हा इकार लांबवणं वेगळं आहे. त्यातून, 'ही आत्ताची वेळ.. हा गोड क्षण नको ना गमावूस!' हे आर्जव ऐकू येतं. त्यांची आणखी एक खासियत म्हणजे गाण्याचं ध्रुवपद ते कधीही तुटक ठेवत नसत. वाद्यसंगीताचा तुकडा सुरू होईपर्यंत ती 'आस' कायम ठेवत असत.

**संगीतकारांच्या शैली आणि रफी-गायकी**

अनेक संगीतकारांच्या गाण्यांना रफी-स्पर्श झाल्यावर ती गाणी लख्ख उजळून निघाली आणि अजूनही तळपतायत! काही गाण्यांत 'करामती' नव्हत्या. गळ्याची तयारी दाखवायचीच नव्हती. काव्य चांगलं होतं, पण फार खोल होतं असंही नाही.. अशा गाण्यांत गायकीचा खरा कस लागला आहे. संगीतकारांचीही एक भाववृत्ती असते, ती जाणून घेऊन रफी गायले आहेत. रफीसाहेबांना ज्यांचे वात्सल्यपूर्ण आशीर्वाद कायम लाभले होते, ते नौशादसाहेब आणि इतर काही संगीतकार यांचा या दृष्टीनं परामर्श घेऊ.

नौशादसाहेबांचं रफीप्रेम सर्वश्रुत आहे. पण हा विश्वास रफीसाहेबांनी एका रात्रीत कमावला नाही. खडतर तपश्चर्या होती, त्यामागे. 'सुहानी रात ढल चुकी' असो किंवा 'दुनिया में कम न होंगे ये ज़िंदगी के मेले', 'दिल में छुपा के प्यार का', असो.. स्वर-शब्दांची घट्ट वीण हे नौशादमियांचं खास वैशिष्ट्य आत्मसात करत, एकेक गाण्याच्या किमान दहा-वीस तालमी करत रफीसाहेब गायलेत. तेव्हाच ते काम अजोड ठरलं आहे. कारण नौशादसाहेबांच्या चाली इतक्या घट्ट बांधणीच्या असत, की त्यात हलायला जागाच नसे. उदा. 'ये ज़िंदगी के मेले' हे गाणं नीट ऐकताना, त्यात 'दुनिया है मौज़े दरिया कतरे की ज़िंदगी क्याऽऽऽऽऽ' हा 'आ'कार आणि 'पानी में मिलके पानी अंजाम ये के फानी' हा 'इ'कार दोन्हीवर बिकट ताना आहेत. टप्प्याच्या अंगानं जाणाऱ्या!

त्या ज्या वजनानं आणि ताकदीनं रफीसाहेबांच्या गळ्यातून गेल्या आहेत, ते समजायलाही अवघड आहे.

सचिन देव बर्मनदादांचं किशोरवर प्रेम होतंच, पण रफीच्या ताकदीचीही पुरेपूर कल्पना होती त्यांना. त्यांचं एक गाणं आठवतं, ते म्हणजे 'ऐसे तो ना देखो!' त्यातली नायिका, हळूच डोकावून बघणारी.. घायाळ करणारी. आणि 'तू असं बघितलंस तर संयम सुटेल माझा, आणि खूबसूरत ख़ता हातून होईल' हे तिला बजावणारा, तिच्या प्रेमात आकंठ बुडालेला तो! 'ऐसे तो ना देखो..' नंतरचा पॉज त्या 'कटाक्षासाठी' बर्मनदा ठेवतात, तो समजून घेऊन रफीसाहेब गातात. 'देखो' शब्द तुटला पाहिजे.. तरच त्या पॉजला अर्थ आहे ना! 'खूबसूरत सी कोई हम से ख़ता हो जाये', किती किती शक्यता आहेत त्यात! 'हमसे ख़ता' म्हणताना त्या आवाजात अनंत छटा आहेत, त्यांतून कित्येक गोड गुन्हे डोकावतात.. ख़ता हा शब्द प्रत्येक वेळी वेगळ्या अंदाजानं येतो. प्रेयसी या लटक्या इशाऱ्याच्या त्या मानभावीपणाच्याच प्रेमात पडेल.. 'हम तो मस्ती में जाने क्या क्या कहे'मध्ये 'मस्तीमेंऽऽऽऽऽ' या एका शब्दात नादिष्टपणा ओतप्रोत भरलाय. 'लबे नाज़ुक से' म्हणताना लाडिकपणा आहे त्या उच्चारात!

बर्मनदा आणि रफी हे साहचर्य 'मंज़िल', 'प्यासा', 'काला पानी', 'गाईड', 'तेरे घर के सामने', 'काला बाज़ार', 'कागज़ के फूल', 'मेरी सूरत तेरी आंखें' अशा अनेक चित्रपटांत सुखावून गेलं. 'गाईड'मध्ये 'तेरे मेरे सपने अब एक रंग है' हा दिलासा रोझीला रफीसाहेबांच्या अत्यंत मुलायम आणि परिपक्व आवाजातून मिळाला, आणि 'दिन ढल जाये हाये रात न जाये'मधली व्यथा तर इतकी तीव्र, की राजू गाईडचे अपराध माफ करून टाकावेत! जी भूमिका नकारात्मक बनते आहे, तिलाही एक गहिरी छटा देण्यात रफीसाहेब यशस्वी झाले. अगदी गुन्हेगार असला तरी रोझीवरचं त्याचं प्रेम अत्यंत खोल आहे. तिचा नकार तो पचवू शकत नाहीये. इथे रफीसाहेब 'गात' नाहीत, त्यांचा आवाज वाहत राहतो गाण्यात! 'तेरी याद सताये' म्हणताना 'याद'वरचा पंचम कुठून आणला असावा त्यांनी? 'तुम मुझ से मैं दिल से परेशान' हे शब्द नाहीतच. या फक्त भावना आहेत, अवस्था आहेत. भावनांचं स्वरांमध्ये भाषांतर करू शकणारी गायकी दिसते इथे. प्रेक्षकांची गमावलेली सहानुभूती गायकाच्या आवाजातून नायकाला मिळावी, हा एक चमत्कारच.

'तेरे घर के सामने'मधलं अतिशय उत्फुल्ल 'एक घर बनाऊँगा' असो किंवा तसंच 'तू कहाँ ये बता' असो.. भावनांमधला सूक्ष्म फरक रफी फार सुंदररीत्या दाखवत होते. 'तू कहाँ ये बता'मध्ये तिला शोधणारा, तिला बघण्यासाठी आसुसलेला प्रियकर रफीसाहेबांच्या उच्चारात दिसतो. 'नशीलीऽऽऽऽऽ' हा

'ई'कार नशेत भिजवणं त्यांच्यासाठी फार किरकोळ काम होतं; पण कहर म्हणजे नूतन तिच्या बाल्कनीत आल्यावर 'प्यार का देखो असर' हे गाताना आधीच्या अंतऱ्यापेक्षा आवाज वेगळा लागतो. ती दिसल्याचा आनंद ओसंडून वाहतो आवाजात!

रफीजींच्या कारकीर्दीत तीन अत्यंत महत्त्वाची गाणी योगायोगानं बर्मनदांचीच आहेत. 'ये महलों ये तख़्तों ये ताजों की दुनिया' व 'जिन्हें नाज़ है हिन्द पर वो कहाँ है?' ही 'प्यासा'मधली गाणी आणि 'कागज़ के फूल'मधलं 'बिछड़े सभी बारी बारी!'

'प्यासा'मध्ये साहिरची जळजळीत लेखणी आणि रफींचा आवाज यांतून जहाल उपरोध अक्षरश: फुटून बाहेर आला. शेवटी 'तुम्हारी है तुम ही संभालो ये दुनिया'मध्ये वैफल्याचा कडेलोट होतो.. 'जिन्हें नाज़ है'मध्ये जखमी मनातून रक्त ठिबकतं, तर 'बिछड़े सभी बारी बारी' या कैफी आझमी यांच्या काव्यात 'बारी बारी'चा उच्चार असा, की सोडून गेलेले आप्त, भयाण पोरकेपण, सगळं दिसायला लागतं! पोटात तुटतं हा आवाज ऐकताना. 'उड़ जा उड़ जा प्यासे भँवरे'.. हा आक्रोशच भयंकर आहे.

मदनमोहन हा मुळात 'जगाची झोकुनी दु:खे सुखांशी भांडतो आम्ही' म्हणणारा संगीतकार. मदनमोहनचं एक गाणं आठवतं, 'आप के पहलू में आकर रो दिये!' या गाण्यातला खोल उदास भाव अस्वस्थ करतो. आपल्या प्रिय पत्नीच्या वियोगानं वेडापिसा झालेल्या राकेशची (सुनील दत्त) जखम भळभळ वाहते रफीच्या आवाजातून. मुळात आप के 'पहलू' में यातल्या 'पहलू' शब्दातच पत्नी ही पुरुषासाठी काय असते, हे अधोरेखित होतं. जगात कुठेही गेला तरी आईची कूस आणि नंतर पत्नीची कूस.. हीच अशी जागा असते की जिथे तो मनमोकळेपणी रडू शकतो, फुटू शकतो.. 'तू नाहीस!' हे सांगायलाही तिचीच कूस हवी आहे त्याला.. हा भाव या गाण्याचा जीव आहे.. 'रो दिये' म्हणताना आवाज किंचित थरथरतो.. संगीतकारानं प्रत्येक अंतऱ्याची पहिली ओळ दुसऱ्या वेळी गाताना वरच्या ओळीवर अलगद नेऊन ठेवली आहे. हा मधला पूल सांधणारा रफीचा आवाज आहे. 'जब भी उदास'मधला हा 'उदास' शब्द म्हणजे हा पूल आहे, 'आ गये' या स्वरांवर जाणारा.. ती आस, हा आवाज लीलया भरून काढतो. किती सहज असावं हे? 'प्यार में क्या क्या गँवाकर रो दिये..' यात 'क्या'वरचा लयीचा अंदाज विलक्षण.. तो अतिढोबळपणे लांबवलाही नाही आणि तरीही त्यातून कैक गमावलेल्या गोष्टी, हरवलेली सुखं तरळून गेली डोळ्यांपुढून.. इथे त्या गायकीला सलाम करावाच लागतो. मदनमोहनचंच 'तुम जो मिल गये हो' म्हणजे स्वरांचे कंगोरे, वॉइस

मॉड्युलेशन, शब्दफेक.. सगळ्याच बाबतीत बेमिसाल! आणि पंडित जवाहरलाल नेहरूंचं मनोगत सांगणारं 'मेरी आवाज़ सुनो!' एक एक रत्नं आहेत!

इकबाल कुरेशी यांच्या संगीतात, तसंच उषा खन्नाजींकडे काही उत्तम गाणी रफीसाहेबांनी गायली. कमी ऐकल्या जाणाऱ्या 'ये तेरी सादगी, ये तेरा बांकपन' या गाण्यांत सिच्युएशन अशी आहे, की तिच्या साधेपणानं तो वेडा झालाय. त्या भोळेपणानं त्याला आत खोलवर हलवून टाकलंय. तिच्या प्रेमाची नशा त्याच्या प्रत्येक शब्दात ओसंडून वाहतेय, म्हणूनच कदाचित ध्रुवपदाची चाल खालच्या स्वरांवर आहे ..'तोबा शिकन' हे शब्दही वेगळे.. सहसा हिंदी गाण्यात न ऐकू येणारे. जावेद अख्तरसाहेबही वेगळ्या 'मूड'चं लिहून गेलेत.. या शब्दांचा कमालीचा आकर्षक, नशीला उच्चार रफीसाहेब करतात. 'बांकपन' शब्दावरची जागा संगीतकारानं शिकवलेली वाटत नाहीच.. अशी पटकन हरकत घेणं, हे गायकाचंच योगदान असावं. कदाचित उषाजींनी फक्त रिषभाचा सूर दाखवला असावा आणि तो फक्त सूर लावण्यापेक्षा त्याला 'नि सा रे' अशी बारीक हरकत जोडावी, ही रफीसाहेबांची उपज असावी असंच वाटतं. एका स्वराला आधीच्या स्वरांची अशी महिरप देऊन पेश करणं, हे कित्येक गाण्यांत केलं आहे त्यांनी.. 'है कली कली के लब पर तेरे हुस्न का फ़साना' म्हणताना 'हुस्न का'वरची हरकत याच प्रकारात मोडणारी आहे. संगीतकारांच्या अपेक्षांपेक्षाही कितीतरी जास्त, भरभरून देणारा गायक होता हा.

संगीतकाराचा स्वभाव त्याच्या चालींमध्येही उतरतो. ओ. पी. नय्यर हा एक बेधडक, टिपिकल पंजाबी रांगडेपण असलेला संगीतकार. त्याच्या चालींमध्ये असलेली पंजाबी मस्ती रफीच्या गाण्यांत दिसते. 'नाझनीन तू नहीं जा सकेगी छोड़कर ज़िंदगी के झमेले!' ('मैं प्यार का राही हूँ') ही ओळ तारसप्तकात आहे, एवढंच तिचं वर्णन पुरेसं नाही.. तर तो मिजाज़ही तसाच आहे.. त्या क्षणी तो आवाज कुठल्यातरी वेगळ्या प्रतलावर वावरतोय, हे जाणवतं. जिथे दंगामस्ती करायची होती, तिथे रफीसाहेब शब्दश: नाचत-उड्या मारत गायले असावेत असं वाटतं. 'सरपर टोपी लाल हाथ में रेशम का रूमाल' किंवा 'हाय रे हाय ये तेरे हाथ में मेरा हाथ..'मधला शेवटचा धुमाकूळ आठवा. आश्चर्य म्हणजे अतिशय मितभाषी स्वभाव असलेले रफी, कुठल्याही फिल्मी पार्ट्या टाळण्याकडे कल असलेले रफी अशा गाण्यांत मात्र बेधुंद मस्ती करत होते. कारण त्या वेळी संगीतकाराचा मिजाज़, त्या भूमिकेचाच स्वभाव त्यांच्यात संचारत होता.

लक्ष्मीकांत प्यारेलाल आणि रफी हे अतूट नातं होतं. प्यारेलालभाईंना रफींबद्दल भरभरून उमाळ्यानं बोलताना मी अनुभवलं आहे. 'चाहूँगा मैं तुझे

सांझ संवेरे' हे 'दोस्ती'मधलं लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या करियरचं अगदी सुरुवातीचं गाणं रफी विलक्षण तळमळीनं गायले. या गाण्यासाठी रफीसाहेबांना आणि संगीतकार म्हणून लक्ष्मीकांत प्यारेलाल यांना फिल्मफेअर पुरस्कार मिळाले आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल प्रथम श्रेणीत जाऊन पोचले. त्यांचं 'तेरे नाम का दीवाना तेरे दर को ढूँढता है' हेही मला अतिशय आवडणारं गाणं. 'दीवाना' शब्दावरची जागा त्या गाण्याला फार उच्च दर्जा प्राप्त करून देते. 'शागिर्द'मध्ये 'बडे मियां दीवाने ऐसे ना बनो'सारखं महाखट्याळ आणि वात्रट टोनचं गाणं ज्या ढंगात रफीसाहेब गायले, तो लाजवाब होता.

'खिलौना जान कर तुम तो मेरा दिल तोड़ जाते हो' या गाण्याशिवाय लक्ष्मीकांत प्यारेलालजींची कारकीर्द पूर्ण होऊ शकत नाही. संजीवकुमारचा अभिनय आणि रफीची गायकी.. दोन्ही चरमबिंदूवर आहेत. इथे आवाजाचं संस्कारित स्वरूप टाळून गायचं होतं. हे म्हणजे एखाद्या पट्टीच्या पोहणाऱ्याला बुडण्याचा अभिनय करायला सांगण्यासारखं होतं. मानसिक रुग्ण असलेला विजय (संजीवकुमार) चंदाला विनवतो आहे. तो कसं गाईल? कशी हाक मारेल? 'खिलौना जान कर तुम तो'मध्ये 'तुम तो..' हा शब्द गद्य आणि पद्य यांच्या सीमेवरचा उच्चारतात रफी. 'ओऽऽऽऽऽ' ही हाकच काळजाचं पाणी पाणी करते. 'गिला तुम से नहीं कोई' हे एकाच स्वरावलीचे शब्द आहेत. यात संगीतकाराची प्रतिभा दिसते. सा, रे आणि कोमल ग याच स्वरांची पुनरावृत्ती आहे, म्हणजे संगीतकारांनीही मनोरुग्ण असलेली व्यक्ती गाऊ शकेल, अशीच चाल दिली आहे. 'जिस ग़म ने मेरा दामन बड़ी मुश्किल से छोड़ा है, उसी ग़म से मेरा फिर आज रिश्ता जोड़ जाते हो' हा कळवळून विचारलेला प्रश्न.. खिडकीच्या गजांतून नंतर फक्त दिसणारे संजीवकुमारचे हात... तिला बोलवणारे! हे सगळं रसायन रडवायला पुरेसं आहे.

एका गाण्याबद्दल प्यारेलालजी नेहमी भरभरून बोलतात, ते म्हणजे 'हुई शाम उनका ख़याल आ गया!' एकदा टेक 'ओके' झालेलं हे गाणं रफीसाहेबांनी पुन्हा गायलं. त्यांत नवीन हरकती, जागा घेतल्या आणि सर्वस्वी वेगळ्या टोनमध्ये पुन्हा गायले, तेव्हा त्यांचं समाधान झालं. 'पारसमणी'मधल्या 'वो जब याद आये'मध्ये संपूर्ण गाण्यात एक प्रकारचा कंप आहे आवाजात.

संगीतकार जयदेव यांच्याकडे काही अप्रतिम गाणी रफी गायले. 'हम दोनों'मधली 'कभी खुद पे कभी हालात पे रोना आया', 'मैं ज़िंदगी का साथ निभाता चला गया' ही गाणी तर सुरेख आहेतच; पण 'तेरी तसवीर भी तुझ जैसी हसीन है लेकिन' हे कमी ऐकलं जाणारं 'किनारे किनारे'मधलं गाणं अप्रतिम आहे. जयदेवजींनी जणू रफीसाहेबांना गायकी अंगानं गाणं खुलवण्यासाठी

मोकळं सोडलं असावं, इतक्या सुंदर जागा आहेत यात.

रोशनसाहेबांचा ओढा शास्त्रीय संगीताकडे होता. त्यामुळे त्यांच्याकडे रफीसाहेबांनी गायलेल्या गाण्यांमध्ये रागदारीवर आधारित रचना जास्त आहेत. पण या जोडीचं सर्वांगसुंदर गाणं म्हणजे यमन रागावर आधारित 'ज़िंदगी भर नहीं भूलेगी वो बरसात की रात!' साहिरजींच्या अक्षरा-अक्षरांतून प्रणय वाहतो आहे.. कमालीच्या तेजस्वी आणि चित्रदर्शी शब्दकळेचं रफीसाहेबांच्या आवाजात सार्थक झालं. ती सौंदर्यखनी मधुबाला, ते तिचे मोहक विभ्रम, आणि रफींच्या आवाजात 'बरसात' आणि 'रात' शब्दांवरची थरथर! अनोखा अनुभव आहे हा! 'हाये वो रेशमी..' यातला 'हाये' शब्द तर जीव घेतो. 'बरसता पानीऽऽऽऽ'वरचा गंधार असा काही लागतो, की पावसाच्या पाण्याला तिच्या केशसंभारातून झिरपताना वाटणारा सुकून त्या गंधारावरच्या ठहरावात आहे, हे जाणवतं. 'फूल से गालों पे रुकने को'वर अचूक थबकणारा ताल आणि तरसता 'पानी'वरचा पंचम! ऐश्वर्यसंपन्न क्षण आहेत हे! 'सुर्ख़ आँचल को दबा कर जो निचोड़ा उस'ने गाताना 'निचोड़ा' हा उच्चार त्या कृतीचा भास देणारा असा करणं रफीसाहेबांसाठी कधीच अवघड नव्हतं, कारण काव्य संपूर्णपणे मनात भिनवून त्यानंतरच ते शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडत होते.

रोशनसाहेबांकडेच गायलेलं 'स्वप्न झरे फूल से, मीत चुभे शूल से' ऐकून डोळ्यांना धारा लागतात, हे अगदी खरं आहे. त्या गाण्यातलं वैफल्य सूक्ष्मपणे ओळखणारी गायकी आहे रफीसाहेबांची. नीरजच्या सर्वांत गाजलेल्या काव्यांपैकी एक होतं हे. या गाण्याची नस त्यांना कशी सापडली असावी? फूल गळून पडावं, तशी जपून ठेवलेली स्वप्नं डोळ्यांदेखत धुळीला मिळतात. ज्यांना आपलं म्हणावं अशी माणसं जणू तीक्ष्ण भाल्यानं काळजाला जखमा करून जातात. आणि हे सगळं हताश नजरेनं बघण्यापलीकडे आपण काहीही करू शकत नाही. आयुष्य निसटून जातं.. हातातून वाळू निसटून जावी तसं. उरतात फक्त अपुऱ्या इच्छा, आकांक्षा! ही खंत ज्या मानसिक अवस्थेतून नीरजनं शब्दांत मांडली असेल, त्याच अवस्थेत रफींना जाता आलं.. परकाया-प्रवेशच आहे हा! 'उम्र के चढ़ाव का उतार देखते रहे' म्हणजे काय? ऐन तारुण्यात आयुष्याचं पैलतीरच दिसायला लागणं... स्वत:चा अध:पात अनुभवणं... आयुष्याचा कारवाँ पुढे निघून गेल्यानंतरचा धुरळा बघणं ज्यांच्या नशिबी आलं, अशा अभागी जिवांचं हे आक्रंदन आहे. यातली प्रत्येक ओळ वैफल्यात बुडालेली. 'नींद भी खुली न थी के हाय धूप ढल गई!' काही समजायच्या आत जरा कुठे आयुष्य सावरायला जावं, तर ते आधीच अस्ताला लागावं? एकेकाळचं यश आणि आताची अवस्था, आवाजातून रफीसाहेब कशी दाखवतात? 'क्या

शबाब था के फूल फूल प्यार कर उठा.. थामकर जिगर उठा..' हे गतकालीन वैभव..! इथे आवाज उत्तेजित आहे आणि 'एक दिन मगर यहाँ ऐसी कुछ हवा चली' हा आवाज अत्यंत हादरलेला, धक्का बसलेला आवाज आहे. या गाण्याचा शेवटचा अंतरा रडल्याशिवाय मी आजही ऐकू शकत नाही. कधीतरी दिसलेला एक आशेचा किरण, एखाद्या नववधूसारखा तेजस्वी! वाजत गाजत येतो आयुष्यात.. पण त्या क्षणाचं सोनं व्हायच्या आत, त्याच्यावर जणू वीज कोसळते..! त्या क्षणाचा सिंदूर फिसकटतो आणि हे सगळं लांब उभं राहून फक्त बघत बसणं भाळी लिहिलेलं असतं.. त्या क्षणाची पालखी.. खरं तर अंत्ययात्राच वाहून नेणारे भोई दिसतात फक्त..! 'और हम अजान से दूर के मकान से पालकी लिए हुए कहार देखते रहे!' आणि हे गाताना रफीसाहेबांना हे माहीतही नसेल, की लाखो पराभूत मनांना घातलेला बांध या गाण्यानं फुटणार आहे! रडणार आहेत माणसं हे ऐकून.. आणि त्या भावनेतून मुक्तही होणार आहेत! त्या क्षणांचं देणं फेडणार आहेत!

'तुम एक बार मुहब्बत का इम्तहान तो लो' हे रोशनसाहेबांचं गाणं रफीसाहेबांनी 'इम्तहान' या एका शब्दावर पेलून दाखवलं आहे. नीट ऐकलं, की त्या अतिकोमल गंधाराचीही खोली लक्षात येते. 'बार बार तोहे क्या समझाए'सारखं ड्युएट नायिकाप्रधान होतं; पण 'आ तोहे सजनी ले चलूँ नदिया के पार', हे किती मीलनोत्सुक आवाजात गावं? खरोखर ती उत्कंठा, 'नदिया के पार' पोचल्यावरचे प्रणयाचे मंतरलेले क्षण त्या आवाजात आधीच दिसायला लागतात.

कल्याणजी आनंदजी यांच्याकडे रफीसाहेब जास्त गायले नाहीत. पण अगदी सुरुवातीच्या काळातलं 'सम्राट चंद्रगुप्त'मधलं 'चाहे पास हो चाहे दूर हो' हे गाणं या संगीतकार जोडीसाठी मैलाचा दगड ठरलं. 'जब जब फूल खिले' गाजला, तो त्यातल्या सुरेख गाण्यांमुळे. 'परदेसियों से ना अँखियाँ मिलाना' या गाण्याची मोहिनी आजही कायम आहे. आणि खास गिरगावचा दहीकाला, त्यात साक्षात शम्मी कपूरचा दंगा, 'गोविंदा आला रे आला'मध्ये असा काही रंग जमवून गेला, की गोकुळाष्टमीचा सण या गाण्याशिवाय आजही साजरा होऊ शकत नाही. कल्याणजी आनंदजी गिरगावकरच. त्यामुळे हा थरार त्यांनी नेमका पकडला. यात 'जरा बच के संभल के जी रहना' ही ओळ विलक्षण फिरतीनं वळवली आहे. वास्तविक या गाण्यात गायकी दाखवण्यासाठी वाव नव्हताच; पण सोनं कुठेही टाका, झळाळून उठतंच!

शंकर जयकिशनकडचा रफी जास्त वैविध्यपूर्ण आहे. 'अकेले अकेले कहाँ जा रहे हो'चा तो धुंद व्हायब्रेटो कमालीचा मादक.. त्यात पॅरिसचा

गुलाबी गारवा झिरपतो.. किती प्रकारे गावा 'अकेले' हा शब्द? प्रेयसी विरघळली नाही, तर ती दगडच असली पाहिजे! 'आजा रे आ जरा' हे गाणं म्हणजे तर एक चमत्कार आहे. आवाजाला कंप देताना स्वर किंचितही हलत नाही, आणि ही ओळ प्रत्येक वेळी वेगळी गायलेली आहे. किती मादक व्हावा आवाज?

'ऐ फूलों की रानी बहारों की मलिका' हा अनुनय एका पिढीला वेड लावून गेला. कारण 'नाज़ुक लबों से मुहब्बत की बातें' ही कुजबूज, तिच्या ओठांतून येणारे शब्द, ते गुफ़्तगू सगळं सगळं त्या आवाजात ऐकू आलं! शम्मीच्या धसमुसळ्या प्रणयाला 'बदतमीज़ कहो या कहो जानवर' म्हणत, तो पुरून उरला. हिंदी चित्रपटसंगीताचा पोत बदलणारं 'चाहे कोई मुझे जंगली कहे' हे गाणं मैलाचा दगड ठरलं. राजकपूरच्या 'संगम'मध्ये 'ये मेरा प्रेमपत्र पढ़कर'चा सुरुवातीचा तो 'मेहरबाँ लिखूँ, हसीना लिखूँ, या दिलरुबा लिखूँ? हैरान हूँ के आप को इस खत में क्या लिखूँ?' हा संभ्रम किती गोड आहे ना! एकाच सुरावर असलेली मेहरबाँ, हसीना आणि दिलरुबा ही तीनही विशेषणं स्वतंत्र अंदाजात गायली आहेत. कमाल आहे ही. 'आप को' हे शब्द नीट ऐकले, तर त्यांतला रोमान्स वेड लावतो. कारण शुद्ध मध्यमाची हळवी श्रुती सहज लागते आवाजात, कुठल्याही वाद्यात सापडू न शकणारी!

वसंत देसाई यांच्याकडचा रफीही ऐकण्यासारखा. सर्वांत सुंदर गाणं म्हणजे 'कह दो कोई ना करे यहाँ प्यार'. विषण्ण भाव आहे हा! अंतऱ्याची शेवटची ओळ खाली घेऊन येणं अवघड होतं. 'इस में चैन नहीं ना करार'वर योजलेली, 'सा' धैवत ते खालचा 'सा' अशी स्वरसंगती खास जोगियाची. पंचमाला टाळून मध्यमाच्या आधारानं खाली येणं, हे पंडित भीमसेन जोशींच्या 'पिया मिलन की आस'मध्येही होतं. तेच कारुण्य वसंत देसाईंना अपेक्षित असावं. ही स्वरसंगती, पंचम न घेता खाली येणं यांत प्रेमाचा आधार निखळल्याचा भास आहेच. जोगिया हा असफल प्रेमाचा, विरहाचाच राग!

'तीसरी मंज़िल'साठी राहुल देव बर्मननं रफीसाहेबांना पाचारण केलं आणि भन्नाट गाणी गाऊन घेतली. रफीसाहेबांच्या गळ्याला अशक्य असा कुठलाच प्रकार नव्हता, त्यामुळे पंचमरंग त्यांच्या गळ्यावर आरामात चढला. 'द ट्रेन'मध्ये, 'गुलाबी आँखें जो तेरी देखी'सारखं जबरदस्त रफ्तार असलेलं गाणं रफी आरामात गाऊन गेले. 'प्यार का मौसम'मधलं 'निसुलताना रे'सुद्धा फार गोड आहे.

चित्रगुप्त यांच्याकडे गायलेली अनेक गाणी रफीसाहेबांच्या एकूण कारकीर्दीत महत्त्वाची आहेत. 'चल उड़ जा रे पंछी' हे केवळ अविस्मरणीय गाणं!

एखादा संगीतकार कमी यशस्वी आहे, म्हणून त्याचं गाणं रफीसाहेबांनी कधीही नाकारलं नाही. रामलाल ('तकदीर का फसाना'), हंसराज बहल ('भीगा भीगा प्यार का समा'), सी. अर्जुन ('ग़म की अंधेरी रात में') ही गाणी किती सुंदर आहेत! जी. एस. कोहली यांचं 'अगर मैं पूछूँ जवाब दोगे' या गाण्यात सुरुवातीचा 'अगर' हाच शब्द इतका मधाळ की पडद्यावर चक्क 'अजित' आहे हे लक्षात येत नाही!

**द्वंद्वगीतांतील भूमिका ओळखण्याचं कसब**

काही ड्युएटमधली स्वत:ची भूमिका ओळखून त्या त्या पद्धतीचा आवाज लावताना त्या भूमिकेचा किती विचार रफीसाहेबांनी केला असावा, हे लक्षात येतं. 'मुझे तेरी मुहब्बत का सहारा', 'आप आए बहार आयी'मधलं हे गाणं रफीसाहेब अक्षरश: रडत, अश्रू ढाळत गायले असावेत... अगदी पहिल्या अक्षरापासूनच... अजिबात आवर घातलेला नाही भावनांना, तशा परिस्थितीतच नाहीये नायक हा. 'मेरे बदलेऽऽऽ तू हँस लेती, तेरे बदले मैं रो लेता' हे वचन शब्दश: जगलेत. तांत्रिकदृष्ट्या बघायचं, तर या गाण्यात लताबाईंशी स्पर्धा करणं अजिबात सोपं नव्हतं. 'बदलेऽऽऽऽ' हा शुद्ध धैवत कमालीचा आर्त लागलाय. काटा येतो अंगावर. 'तेरे'वरची हरकत किंचित डिस्टर्ब झालीय, तेही खूप नैसर्गिक. याला म्हणतात तंत्राच्या पुढे जाणं!

'मुहब्बत कर तो ले लेकिन मुहब्बत रास आये भी' ('ये दिल तुम बिन कहीं लगता नहीं') यात एक पराभूत भाव ऐकू आला. जगरहाटीपुढे झुकून तो प्रेमाला तिलांजली द्यायला तयार झालाय.. 'हजारों ग़म ही इस दुनिया में अपने भी पराये भी...' असं निक्षून सांगणारा आवाज प्रेयसीची समजूत घालणारा होता. स्वत:पलीकडे बघणारा, प्रेमालाही एका उंचीवर नेणारा होता. 'कोई किसी को चाहे तो क्यूँ गुनाह समझते हैं लोग' ('पत्ता पत्ता बूटा बूटा') असं कळवळून विचारणाऱ्या त्या नायकाची दया येते.

द्वंद्वगीत गाताना आपण कुठल्या गायिकेसोबत गात आहोत, याचं भान रफीसाहेबांना होतं. त्यामुळे ते गायिकेला प्रतिसाद देत देत गायले आहेत. म्हणजे गायिका कुणीही असो, मी माझ्याच शैलीत गाणार असा पवित्रा कुठेही दिसत नाही. जशी त्यांनी गाण्यातली नायकाची भूमिका ओळखली, तशी सहगायिकेच्या शैलीला साजेलसं गाणं, तिच्याशी संवाद साधत गाणं हेही त्यांना साधलं होतं. बारकाईनं त्यांची ड्युएट ऐकली तर हे लक्षात येतं. रफी-लता किंवा रफी-आशा हे तर सुंदर साहचर्य होतंच. लताबाईंसोबत गाताना अनेकदा इथे लताबाई गाण्यावर जास्त प्रभावी ठरतायत असं वाटेपर्यंत एखादी जागा, एक्स्प्रेशन रफीसाहेब असं काही देऊन जातात, की 'क्या बात है!' असंच

म्हणावं लागतं. 'मुझे कितना प्यार है तुम से'सारखं समजूतदार ड्युएट असो किंवा 'दिल तेरा दिवाना'सारखं पावसाळी मादक गाणं! कांटे की टक्कर असूनही स्वत:पेक्षा 'गाणं' कसं जिंकेल, हेच बघितलं रफीसाहेबांनी! आणि तरीही ते अजोडच ठरले. किशोर आणि लताबाईंच्या एका गाण्यात रफीसाहेबांची एक एंट्री आहे, ती भूमिकाच वेगळी आहे. नायिकेचा भूतपूर्व प्रियकर तिला आठवतो आहे; उन्मुक्त, उत्साही, बेधुंद जगणारा!... रफीसाहेबांच्या वाट्याला आलेल्या चार ओळींत त्या प्रियकराची भूमिका ते अक्षरश: जगतात. 'क्या मौसम है' हे ते गाणं! त्यातला 'ये मस्तियाँ ये बहार' ही सुरुवातच इतकी उत्तुंग स्वरांत होते. 'येऽऽऽऽऽ बहार'वरचा तार षड्ज खरोखर आकाश भेदून जाणारा आहे. राजेश रोशन यांनी एक मुलाखतीत सांगितलंय, की आठ दिवस ज्या गाण्याची तालीम किशोरकुमार आणि लताबाई करत होते, ते गाणं निव्वळ स्वत:च्या तल्लख स्मरणशक्तीनं, एकही सूर इकडचा तिकडे न हलवता थेट येऊन गायले रफीसाहेब! हेच होतं ते गाणं!

आशाबाईंच्या नटखट गायकीला साजेलशी रफीसाहेबांची गायकी असते. मग ते 'आजा आजा मैं हूं प्यार तेरा'सारखं फडकतं गाणं असो किंवा सॉफ्ट 'चाँद सा मुखडा क्यूँ शरमाया' असो. 'घबराया' शब्दावर आशाबाई कमाल करतात, पण मुळात 'चाँद' हाच शब्द किती उत्कट आहे!... 'चाँद'वरची 'मुरकी' अक्षरश: कल्पनेबाहेरची. 'दीवाना मस्ताना हुआ दिल' आणि 'अच्छा जी मैं हारी' या गाण्यांत रफी आणि आशाबाईंची दिसणारी केमिस्ट्री कमाल आहे. तिच्या चिडवण्याला रफीसाहेबांचं उत्तर, तरीही तिच्यापेक्षा किंचित परिपक्व आवाज लावणं.. काय वेगळा असतो उत्तम अभिनय यापेक्षा?

'चुपके से मिले प्यासे प्यासे कुछ हम कुछ तुम', 'हम आप की आँखों में' ही गीता दत्तसोबतची द्वंद्वगीतं अफाट गोड आहेत. 'चुपके से मिले'मध्ये 'हम तुम', 'मद्धम' या शब्दांत असणारा नादमय हुंकार हेच गाण्याचं मर्म आहे. 'क्या हो जो घटा खुलके बरसे रुमझुमऽऽऽ'मधला 'म कार' रफीसाहेबांनी आवाजाला दिलेल्या घुमाऱ्यामुळे अतीव गोड झाला. 'हम आप की आँखों में'मध्ये 'हम आपके कदमों मे गिर जाएंगे ग़श खाकर' म्हणजे काय, ते उच्चारातून समजतं...

अनेक द्वंद्वगीतांची सुरुवात रफीसाहेबांच्या तालमुक्त ओळींनी झाली. 'दूर बहोत मत जाइए' ('हम दम मेरे खेल ना जानो'), 'बिजली गिरा के आप खुद' ('दिल तेरा दीवाना'), 'तेरे हुस्न की क्या तारीफ करूँ..' अशा गाण्यांत, रफीसाहेबांना गाणं उभं करण्याचा पूर्ण वाव होता. 'दूर बहोत मत जाइये'मध्ये 'दूऽऽऽऽ र' शब्दानं ते अंतर वाढवलं! 'बिजली गिरा के आप खुद' हा आवाज किती तीव्र आहे.. त्या ढगांच्या गडगडाटाला भेदून जाणाराच आवाज हवा

होता इथे. बरं, ही नुसती तीव्र चढ्या स्वरातली पुकार नव्हे. 'हम सादगी पे आपकी लिल्लाह मर गए' गाताना 'आप की' शब्दावर सूक्ष्म थरथर आहे..उच्च स्वरात गाताना त्यांनी नजाकत बिघडू दिली नाही. 'तेरे हुस्न की क्या तारीफ करूँ कुछ कहते हुए भी डरता हूँ..' यातला 'डरता' हा एकच शब्द 'अहाहा!' म्हणायला लावणारा आहे. 'तुझे जीवन की डोर से बांध लिया है'मध्ये, है वरची करामत लाखो वेळा ऐकूनही समाधान होत नाही.

रफी आणि लताबाई एकमेकांसोबत गात नव्हते, त्या काळात सुमन कल्याणपूर यांच्यासह काही द्वंद्वगीतं त्यांनी गायली. खय्यामसाहेबांच्या 'ठहरिए होश में आ लूँ'मध्ये एका हुंकारात सुमनताई जिंकतातच, पण रफीसाहेबांचा हायसुद्धा कमालीचा धुंदावणारा! 'ऐसी क्या शर्म भला पास तो आने दीजे'मध्ये प्रणयातुरता किती ठासून भरलीय! 'दूर की चाहत बन के' म्हणताना 'दूऽऽऽर' शब्द लांबवल्यानं ते अंतर वाढलं! सुमनताईंबरोबरचं 'अजहुँ न आये' तर गाजलंच, कारण यात 'मन'वरची तान ही एकच, अशी 'सही' रफीसाहेबांनी करून ठेवली. अशी तान गाऊन गेले, की त्याच्या आसपाससुद्धा जाणं कुणा मानवी गळ्याला शक्य नाही. सुरैयाबरोबरचं 'ये सावन रुत तुम और हम' हे झकास गाणं वॉल्ट्झवर नाचायला लावतं. मुबारक बेगमसोबत असलेलं 'मुझ को अपने गले लगा लो' हे ड्युएट एक रचना म्हणून सुंदर आहेच, पण मुबारक बेगम 'मुझ को अपने'नंतर एक पॉज घेतात, तो रफीसाहेब घेत नाहीत.. 'मुझ को अपने गले लगा दो' हे शब्द सलग उच्चारल्यानं निकटता वाढली. आणि 'तुम को क्या बतलाऊँ मैं के तुम से कितना प्यार है' ही ओळ अगणित वेळा ऐकावी.. त्या 'प्यार है'मध्ये काय नाही? समजूत घालणं, तिच्या कुशीत विसावणं..! एक शब्दात आल्यात सगळ्या भावना, जणू तो 'प्यार' हा शब्द एखाद्या ओंजळीत ठेवलेल्या एका चिमुकल्या फुलपाखरासारखा भासतो, ज्याला वाराही सहन होणार नाही! त्याच्या पंखांवरचे वरचे रंग फिकुटतील, असा तो शब्द सांभाळलाय रफीसाहेबांनी.

### शास्त्रीय संगीत आणि रफी–गायकी

रीतसर शास्त्रीय संगीत शिकणं आणि त्याचा गायकीत उपयोग करणं, यांत एक भान ठेवावं लागतं; ते म्हणजे स्वराची सच्चाई आणि गोलाई, घुमारा शास्त्रीय संगीतातून आत्मसात केला असला तरी बारीक मुरक्या, ताना, टोन यांत गमक किंवा कोरडेपणा येऊ न देणं अत्यंत महत्त्वाचं असतं. रफीसाहेबांची जी गाणी रागदारीवर आधारित आहेत, त्यांत स्वरांचा लगाव जास्त भरीव ठेवलेला आहे. 'मन तरपत हरी दर्शन को आज' हे गाणं मालकंस रागावर आधारित आहे. नौशादसाहेबांनी त्यात तालाची चौकट ध्रुपद

गायकीसारखी ठेवली आहे, म्हणजे एकेका मात्रेवर एक अक्षर आहे. त्यात एक भारदस्तपणा आहे. हे गाणं नाहीच, जणू मालकंस रागातली एक बंदिश आहे आणि त्याच वजनानं रफीसाहेब गातात. 'तुमरे द्वार का मैं हूँ जोगी'चा वरचा षड्ज किती सुरेल टोकदार आणि तेजस्वी आहे! त्याला जोडून आलाप घेण्यातली सहजता एखाद्या कसलेल्या शास्त्रीय गायकासारखीच आहे. अंतरा संपताना अत्यंत अवघड अशी वरच्या 'सा'पासून खालच्या 'सा'पर्यंत जी तान शब्दांत गुंफली आहे, ('सब गुणीजन पे तुमरा राज') ती केवळ लोकोत्तर आहे. किती ती सहजता! प्रत्येक स्वर मोत्याच्या दाण्यासारखं स्वतंत्र अस्तित्व दाखवणारा, तरी त्या लयीच्या मूळ सूत्रात बांधलेला! 'मुझे दर्शन भिक्षा दे दो' हा आकांत चरमसीमेला जातो आणि तारमध्यम झळाळून उठतो... गुरुमाऊलीच काय, साक्षात तो मुरलीमनोहर धावत येईल, अशी हाक आहे ही! या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी देवपूजेचं वातावरण होतं, शुचिर्भूत कलाकारांनी ही पूजा बांधली आहे. स्वरांतून मोक्षप्राप्ती होताना धर्म वगैरे गोष्टी गैरलागू असतात, हे या गाण्यानं सिद्ध केलं.

'ओ दुनिया के रखवाले सुन दर्दभरे मेरे नाले'मध्ये राग दरबारी अंगभूत गांभीर्य घेऊन आला. मुळात राग इतका भारदस्त आणि स्वरावरच्या ठहरावाला महत्त्व देणारा, की 'रफी–गायकी' अधिकच तळपली नसती तरच नवल! 'भगवानऽऽऽ' या शब्दावरचा अतिकोमल गंधार दरबारीला अपेक्षित असाच लागला आहे. या गाण्यात शेवटी 'रखवाले' ही पुकार तारमध्यमापर्यंत जाते. शब्दशः आकाश भेदणारा हा सूर आहे. यू ट्यूबवर हे गाणं रफीसाहेबांनी लंडनमध्ये गायलेलं उपलब्ध आहे. त्यात ज्या जागा त्यांनी घेतल्या आहेत, ती इम्प्रोवायझेशनची कमाल आहे. 'महल उदास और गलियाँ सूनी' किती खुलवलं आहे, ते ऐकण्यासारखं आहे. त्यात ते रागाची चौकट ओलांडून पुढे जातात. त्याला चक्क एक अरेबिक टोन दिला आहे. तऱ्हातऱ्हांनी खुलवली ही बंदिश त्यांनी!

'मेरी सूरत तेरी आंखें'मधलं 'नाचे मन मोरा मगन' हे गाणं तालप्रधान आहे. तबल्याचे बोल आणि शब्द एकजीव झाले आहेत. त्या लयीच्याच अंगानं गाण्याचे बोल जाणं, तरीही त्यात भाव ओतून गाणं ही एक अवघड जोखीम होती. भैरवी रागातल्या ताना घेत तारसप्तकातल्या मध्यमावर कलाकुसर करत ते खाली येतात, आणि रंगमंचावरचे दिवे लागतात. गायकाचा चेहरा दिसतो, जो आत्तापर्यंत मुद्दाम अंधारात ठेवलेला होता. इथून पुढच्या दोन ओळींत रफीसाहेबांनी स्वतःच्या आवाजात ते अवघडलेपण कमालीचं जिवंत केलं. इथे शास्त्रीय गायन आणि अभिनय दोन्हीची कसोटी होती.

याशिवाय 'मधुबन में राधिका' ('हमीर') 'राधिके तूने बंसरी चुराई' ('मालकंस') 'बड़ी देर भई' ('पिलू') 'कुहुकूहू बोले' (सोहनी, बहार, जौनपुरी, यमन) आणि इतर अनेक गाणी रागावर आधारित होती, जी रफीसाहेबांनी रागाच्याही पलीकडे नेली. 'राधिके तूने'मध्ये 'चुराई'वरची तान म्हणजे त्यांची स्वतःची उपज आहे. अनंत वेळा ऐकावी!

**विनोदी ढंगाची गाणी**

रफीसाहेबांचा आवाज इतका लवचीक होता आणि स्वभावच इतका स्फटिकासारखा स्वच्छ होता, की कुठलाही रंग त्या गळ्यावर आपसूक चढे. 'सर जो तेरा चकराये', 'रेमामा रेमामा रे' किंवा 'जंगल में मोर नाचा' असो.. या गाण्यांत रफी लहान मूल झाला, तेल-मालीशवाला झाला, सहजपणे. जॉनी वॉकरसाठी गातानाही दोन वेगळ्या गाण्यांत एकच आवाज नव्हता. 'ए दिल है मुश्किल' हा आवाज आणि  तेल-मालीश' हे वेगळे आवाज आहेत.

**नायक अभिनेत्याला शोभेल असा आवाजाचा लगाव**

अनेक नायकांसाठी गाताना त्या त्या नायकाची शैली, मिजाज समजून घेऊन रफीसाहेब गायले आहेत. दिलीपकुमार, देव आनंद, शम्मी कपूर, जॉय मुखर्जी, राजेश खन्ना, जितेंद्र, प्रदीपकुमार, भारत भूषण, अमिताभ बच्चन अशा अनेक नायकांसाठी गाताना आवाजाच्या घनतेमध्ये, त्यातल्या मुरक्या-हरकतींमध्ये रफीसाहेब बदल करताना दिसतात. शम्मीची शैली नृत्यप्रधान आहे. त्याच्यासाठी जेव्हा रफीसाहेब गायले, तेव्हा गाण्यात जास्त झटके (Jerks) दिसतात. अगदी 'सुभान अल्ला हसीन चेहरा'सारखं गाणं घ्या. हे काही नाचरं गाणं नाही, तरी शम्मी त्यावर काय अदाकारी करेल, याचा विचार त्यांनी आधीच केलाय. किती प्रकारे 'सुभान अल्ला' हा शब्द गायलेत! आणि त्या गायनातल्या 'लचकण्यानं' शम्मीच्या अदाकारीला, त्याच्या लचकण्याला – मुरडण्याला भरपूर वाव मिळाला आहे. 'आसमान से आया फरिश्ता' हे गाणं शम्मी कपूरच्या अनुपस्थितीत गायलं, मनोमन तो कुठे - कशी ॲक्शन करेल याची कल्पना करून! 'तारीफ करूँ क्या उसकी' ही ओळ अनेक प्रकारे गावी अशी विनंती करणारा शम्मी कपूरच होता. त्याला या गाण्यात एक क्रेसेंडो हवा होता. गाण्याला एक कळसाध्याय हवा होता. नय्यरसाहेबांच्या अगदी मनाविरुद्धच होतं हे! पण प्रत्येक वेळी नवी जागा घेत, नव्या ढंगात तब्बल सहा वेळा रफी गायले आणि शम्मीनं या सगळ्याचं सोनं केलं पडद्यावर! आणि ते दृश्य बघून नय्यरसाहेबांनी शम्मीला कडकडून मिठी मारली! जितेंद्रला त्याच्यातला 'जम्पिंग जॅक' सापडला, तो 'मस्त बहारों

का मैं आशिक मैं जो चाहे यार करूँ'मध्ये. राजेश खन्नाचं मान तिरकी करणं, डोळे बारीक करणं या सगळ्याला साजेलसा आवाज 'छुप गये सारे नज़ारे'मध्ये आहे. अगदी नेमकं सांगायचं, तर 'ओय क्या बात हो गयी'वरचा 'ई'कार खास राजेश खन्नाचा.

दिलीपकुमारांचा गंभीर स्वभाव, 'अंडरप्ले' शैली त्यांच्या कारुण्यप्रधान गाण्यात रफीसाहेबांनी स्वत:च्या आवाजानं सांभाळली. जेव्हा 'नैन लड़ जई हो तो मनवा मां कसक होई बे करी'सारखं मुक्त आनंदी नृत्यप्रधान गाणं गायलं, तेव्हा तो आवाज कमालीचा उत्फुल्ल नि उत्तेजित आहे. देव आनंद हा अगदी शंभर टक्के चॉकलेट हीरो. तो जास्त उछलकूद करणार नाही, अंगविक्षेप तर अजिबात करणार नाही. मग त्याचा स्वभाव कसा आहे, तर मिश्कील नि रोमँटिक. नायिकेकडून हसत हसत तिचं हृदय जिंकणारा आहे तो! त्याच्यासाठी आवाज लावताना रफीसाहेबांनी या स्वभावाचा विचार केल्याचं स्वच्छ जाणवतं. 'खोया खोया चाँद' आणि 'दिल का भंवर करे पुकार' ही गाणी पुरेशी आहेत. विलक्षण मिश्कील आणि त्याच वेळी प्रेमाचा अगदी तरल हळवा स्तर गाठणारा हा आवाज आहे. 'खोया खोया चाँद'मध्ये 'चारों तरफ इशारे चले किसी के तो हो जाओ' हा अत्यंत वेगळा विचार शैलेन्द्र मांडतो, तेव्हा त्यातला अफाट मिश्कील भाव रफी आपल्या आवाजात पुरेपूर उतरवणार, ही खात्री त्याला असते. इथे कुठेही लटके-झटके आढळणारच नाहीत, तर एक प्रसन्न वावर जाणवतो, देव आनंदच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा! 'दिल का भंवर'मध्येसुद्धा, 'फूल तुम गुलाब का', 'प्यार का राग सुनो' म्हणतानाचं ते कुजबुजणं किती साजून दिसलं देव आनंदला... पूर्ण गाणं जिने उतरत उतरत गायलेलं आहे आणि बर्मनदांची चालही अवरोही! गाताना या अवरोहाचं भान रफी ठेवतात आणि प्रत्येक अंतऱ्याची शेवटची ओळ इतक्या नजाकतीनं खालच्या दिशेनं आणतात, की त्या पायऱ्यांवरून उतरणारी 'ती' दिसावी, तिच्या रेशमी ओढणीची सळसळ ऐकू यावी!

राजेंद्रकुमार, भारत भूषण, प्रदीपकुमार या अभिनेत्यांचा पडद्यावरच्या गाण्यातला वावर अर्थपूर्ण केला तो रफीसाहेबांनी.

श्रीकांत ठाकरे यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी 'हा छंद जिवाला लावी पिसे', 'शोधीसी मानवा', 'हे मना आज कोणी', 'विरले गीत कसे', 'हसा मुलांनो हसा', 'प्रभू तू दयाळू', 'नको आरती की नको पुष्पमाला' अशी मराठी गाणी वारंवार तालमी करून, मन लावून गायली. इतर अनेक प्रादेशिक भाषांमधून रफीसाहेब गायले आहेतच, पण अगदी स्वाहिली आणि सुरीनामी या भाषांमध्येसुद्धा त्यांची गाणी आहेत.

आणखी एक फार वेगळी गोष्ट या गायकीत जाणवते. दुसऱ्याच्या तोंडी असलेलं वाक्य सांगताना आपण त्या त्या व्यक्तीच्या टोनमध्ये बोलतो, तसं 'भूलेगा दिल जिस दिन तुम्हें, वो दिन ज़िंदगी का आखरी दिन होगा..' ('क्या हुआ तेरा वादा') हे वाक्य 'तिच्या' तोंडी असलेलं रफी सांगतायत, ते वेगळ्या टोनमध्ये आहे.

रफी स्वत: एक घराणं होतं. पार्श्वगायनकलेचं खानदानी घराणं! संगीतकार आनंदजी सांगतात, की रफीसाहेब एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणे गाणं शिकत असत. कागदावर खुणा करून ठेवत असत. एका मुलाखतीत स्वत:च्या शास्त्रीय गायनातील गुरूंचा उल्लेख करताना ज्यांच्या संगीतदिग्दर्शनात मी गायलो, ते संगीतकारसुद्धा माझे गुरूच होते, असं आवर्जून नमूद केलेलं आहे. आपल्यामागे आपल्या आईचे आशीर्वाद आहेत, अशी त्यांची ठाम धारणा होती. त्यांना जेव्हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, तेव्हा त्यांची प्रतिक्रिया काय होती? 'सबको ऐसा अवॉर्ड मिलना चाहिए!' किती निरागस उद्गार आहेत हे!

रफीसाहेबांच्या उदार स्वभावाची अनेक उदाहरणं आहेत, परंतु 'कुदरत' चित्रपटासाठी चंद्रशेखर गाडगीळ यांनी गायलेलं गाणंच कायम ठेवावं म्हणून रेकॉर्डिंग सोडून निघून गेले रफीसाहेब. हे किती दुर्मीळ आहे!

रफीसाहेबांनी सुमारे ४४२५ हिंदी, ३१० इतर भाषांमधली आणि ३२८ गैरफिल्मी गाणी गायली, असं आकडेवारी सांगते. पण गाण्यांची संख्या मोजणं अशा गायकांच्या बाबतीत निरर्थक वाटायला लागतं. प्रत्येक गाणं गाताना जे स्वत:ला विसरले, सूर ज्यांच्या रक्तातून वाहत होते आणि ऐकणाऱ्यांच्या मनात कायमचे रुतून बसले; त्यांनी 'किती गाणी गायली' हा प्रश्नच गैरलागू आहे. सहा वेळा फिल्मफेअर, एकदा राष्ट्रीय पुरस्कार आणि 'पद्मश्री' हा नागरी सन्मान रफीसाहेबांना लाभला. त्या त्या पुरस्कारांनाच एक प्रतिष्ठा मिळाली. रफीसाहेबांना मरणोत्तर 'भारतरत्न' मिळावं, ही त्यांच्या कुटुंबीयांची आणि लाखों रसिकांची इच्छा असणं साहजिक आहे. पण हा दैवी सूर, हा पुण्यात्मा या कुठल्याही पुरस्कारांच्या लाखो योजनं पल्याड आहे, हे सत्य आहे.

हा लोकोत्तर कलाकार एक अतिशय ऋजू व्यक्तिमत्त्वाचा पती, वत्सल पिता होता. आपल्या कुटुंबाला प्राधान्य देणारा.. वेळ मिळताक्षणी घरट्यात परतणारा... 'रेमामा रेमामा रे' गाणं ज्या दिवशी रेकॉर्ड झालं, त्याच दिवशी संध्याकाळी मुलांबरोबर हेच गाणं गाऊन मस्ती करण्यात रमलेला, मुलांसोबत पतंग उडवणारा, कॅरम खेळणारा पिता होता. 'बाबुल की दुवाएं लेती जा' हे गाणं स्वत:च्या मुलीच्या वियोगाची कल्पना सहन न होऊन रडत रडत गायलेला भाबडा वधूपिता हाच होता. मुलांवर रागवायची वेळ आलीच, तर त्यांच्या

आईकडे परिस्थिती सोपवणारा वत्सल पिता होता हा! त्याला कुणाचंच दु:ख बघवत नसे; मग भिकारी, गरजू लोक यांना चादरी वाटेल, पैसे देईल, खिशात हाताला लागतील तेवढे पैसे काढून देईल, न मोजता! कुणी विचारलं तर 'खुदानं मला न मोजता दिलंय सगळं, मग मी देताना कसं मोजून देऊ?' हे उत्तर! आणि उजव्या हातानं दिलेलं दान डाव्या हाताला कळत नसे! अनेक जणांना रफी महिन्याकाठी स्वत: मनीऑर्डर करत असत, हे त्यांच्या निधनानंतर घरातल्यांना समजलं! गरीब निर्माता आला तर मानधनाची अपेक्षा न ठेवणारा गायक होता हा! आणि बोलणं कसं? कायम मऊ आवाजात! नौशादसाहेबांच्या भाषेत 'बात करते वक़्त उनकी आवाज कभी पंचम तक गयी ही नहीं!' असा अतिशय मृदू आवाजात, लो पिचमध्येच बोलणारा. इतका भाबडा आणि पापभीरू, की कुणीतरी सांगितलं की गाणं बजावणं आपल्या धर्माच्या विरोधात आहे, तर खरंच गाणं सोडून लंडनला जाऊन राहिला होता! कस्तुरीमृगाला भान नसतं, तसं त्यालाही स्वत:जवळच्या कस्तुरीचं भान नसावं, आणि असलं तरी त्याचा कणभरही अहंकार त्यानं बाळगला नाही कधी.. अमिताभ बच्चन बरोबर 'नसीब' चित्रपटातलं 'चल मेरे भाई' हे गाणं रेकॉर्ड करून घरी आल्यावर स्वत:च उत्तेजित होऊन मुलांना सांगत होता, की आज मी सुपरस्टारबरोबर गाणं गायलो! हे खरोखर अविश्वसनीय आहे. जो स्वत:च सुपरस्टार आहे, त्यानं ही झूल कधीच पांघरू नये हे आश्चर्य नाही का? मन किती स्वच्छ असावं त्यांचं? किशोरकुमारसाठी पार्श्वगायन करताना कुठेही अहंकार आडवा आला नाही त्यांना! 'मन मोरा बावरा' हे गाणं सहजपणे गायलं होतंच की! प्रत्येक दाद, स्तुती स्वीकारताना नकळत आकाशाकडे त्यांचं बोट जात असे. 'ही अल्ला की देन आहे' हे निक्षून सांगत असत आणि हा विनय खोटा नव्हता. चॅरिटी शोसाठी एकही पैसा न घेता गाणं त्यांना सहज जमत असे. ज्या फकिराचं गाणं ऐकत ऐकत त्याच्या मागे बालपणी फिरला असेल, त्या फकिराची फकिरी वृत्ती, ती 'लगन', खुदाच्या आळवणीतली आर्त पुकार नकळत लहानग्या रफीनं त्याच वेळी स्वत:मध्ये सामावून घेतली होती.

केवळ पंचावन्न वर्षांच्या आयुष्यात रफीजी हे एकाच वेळी अद्वितीय गायक तर होतेच, पण मुलांवर उत्तम संस्कारही करत होते. अर्थात स्वत:च्या वागण्यातूनच त्यांनी हे धडे घालून दिले होते.. रफीसाहेबांच्या घरी आजही त्यांची स्पंदनं जाणवतात.. एका शापित यक्षाचंच आयुष्य जगले ते. ना कधी कुणाचा मत्सर केला, ना कुणाला दुखवलं! इतका 'गैरफिल्मी माणूस' या दुनियेनं त्याआधी आणि नंतरही पाहिला नसावा! रफीसाहेब एक 'रियाजी' गायक होते. सर्वोच्च स्थानावर पोचल्यावरही ना त्यांना अहंकाराची बाधा

झाली, ना बनचुकेपणाची.. रोजचा रियाज ही नमाजाइतकीच महत्त्वाची 'इबादत' होती त्यांच्यासाठी! कदाचित अल्लातालाला हा रियाज समोर बसून ऐकायचा असावा, म्हणून केवळ पंचावन्नाव्या वर्षी या असामान्य प्रतिभेच्या गायकाला त्यानं आपल्या दरबारात बोलावून घेतलं.. संगीतक्षेत्रावर हा आघात किती भयानक होता! अगणित गाणी जन्मालाच आली नाहीत! आज रफीसाहेब असते तर...

१९८० सालची गोष्ट! किशोरकुमारच्या झंझावातापुढे काही काळ मंदावलेलं काम पुन्हा सुरू झालं होतं. 'सरगम' चित्रपटातून अतिशय दमदार गायकी सिद्ध झाली होती.. रफी हरले नव्हतेच, थोडेसे दूर गेले होते गाण्यांपासून, यशापासून.! आता 'क्या हुआ तेरा वादा' गाजलं होतं... हळूहळू किशोर आणि रफी दोन्ही प्रतिभावान गायकांसाठी गाणी तयार झाली असती... रसिकांना तृप्त केलं असतं त्यांनी! पण हे घडायचं नव्हतं! तो मनहूस दिवस उगवलाच. ३१ जुलै १९८०! एक सूर्य त्या दिवशी कायमचा अस्तालाच गेला. आदल्या दिवशीपर्यंत म्हणजे जणू शेवटच्या क्षणापर्यंत रफीसाहेब गातच होते! आणि गाणं तरी कुठलं! 'तू कहीं आसपास है दोस्त.. तेरे आने की आस है दोस्त!' काय माहोल असेल तो? त्यांना कल्पनाही नसेल... की हे शेवटचं रेकॉर्डिंग! पुन: हे सूर नाही गुंजणार इथे! निघायची वेळ आली! 'ये ज़िंदगी के मेले दुनिया में कम ना होंगे, अफसोस हम ना होंगे', असं आतून जाणवलं असेल का? त्या स्टुडिओच्या भिंतींनी हे स्वर शेवटचे ऐकले.. जपून ठेवल्या असतील त्या लहरी त्यांनी!

अगदी ३१ तारखेलाही सकाळी तालीम केली रफीसाहेबांनी! हृदयविकाराचा तीव्र झटका, पेसमेकर उपलब्ध न होणं, ॲम्ब्युलन्समध्येच दोन झटके येणं.. संपलं सगळं! संगीतक्षेत्र पोरकं करून गेले रफीसाहेब.. धो धो कोसळणारा मुंबईचा पाऊस!... आणि रसिकांच्या डोळ्यांना लागलेली अश्रूंची संततधार.!. ज्यांनी तो काळकुट्ट दिवस अनुभवला, त्यांना यातली खोल जखम कधीच विसरता आलेली नाही. कैक घरांत त्या दिवशी अन्न शिजलं नाही.. त्या धक्क्यातून बाहेर येणं अशक्य होतं, कारण रफी हे फक्त एक गायक नव्हते तर सामान्य माणसाच्या आयुष्याचा भाग होते. घरातला स्नेहाळ आवाज होता तो! त्याच्याच साक्षीनं वयात आल्या पिढ्या...! त्याच्याच सोबतीनं स्वप्नं रंगवली... जे जे सुंदर होतं, ते सगळं याच आवाजाशी निगडित होतं! आणि पंचावन्न? हे वय होतं जाण्याचं? सुपारीच्या खांडाचं व्यसन नसलेल्या माणसाला असा मृत्यू यावा? पण हे कळवळून विचारलेले प्रश्न अनुत्तरितच राहिले. समाजाचा प्रत्येक स्तर शोकसागरात बुडाला. जेवढं दु:ख श्रीमंतांना झालं, तेवढंच गरीब भिकाऱ्याला!... कारण 'तो' त्याचाही आवाज होता! सगळ्यांना शोकमग्नतेच्या

एकाच पातळीवर आणणाऱ्या या गायकाला 'माणूस' म्हणणंही अयोग्य... हा फरिश्ताच... त्याचं कार्य खुदानं घाईघाईनं का संपवलं, याचा जाब रसिक कायम त्याला विचारत राहणार आहेत... असाच शोकानं बेभान झालेला प्रचंड जनसमुदाय त्यांच्या अंत्ययात्रेला जमला. आकाशालाही अश्रू अनावर झाले... पाऊस थांबलाच नाही. एवढं प्रेम एखाद्या कलाकाराला मिळणं, तेही उण्यापुऱ्या पंचावन्न वर्षांच्या आयुष्यात, हे किती दुर्मीळ आहे! काय ताकद असेल त्या कलाकारात!

रफीसाहेबांच्या निधनाला सुमारे ४४ वर्षं झाली, पण त्यांचे सूर जास्तच तेजानं तळपतायत... येणाऱ्या प्रत्येक नवोदित गायकाला स्वत:ला सिद्ध करताना त्यांच्याच गायकीचा आधार वाटतो आहे. जगभरात त्यांची याद जागवली जाते. बांद्र्याच्या 'रफी मॅन्शन'पुढची गर्दी हटता हटत नाही. 'महंमद रफी' घराण्याचा अभ्यास केला जातो, संशोधन प्रबंध लिहिले जातात! सूर लावून गाणारे येतीलही... पण जीव लावून आतड्यापासून गाणारा रफी पुन्हा नाही होणार! किती गाणी... किती जागा... किती हरकती! अगदी मिश्कील ते खोल दुखावलेला आवाज! किती छटा आठवाव्यात! अनेक गाणी राहून जातात! एक मधाळ अनुराग या आवाजानं फुलवला... पुरुषमनाची स्पंदनं याच आवाजानं टिपली.

रोशनसाहेबांच्या अजरामर कव्वालीला ('ना तो कारवाँ की तलाश है - ये इश्क इश्क है') एका उन्मनी अवस्थेला नेण्यात रफीसाहेबांच्या गायकीचा फार मोठा वाटा होता. 'इंतहा ये के बंदे को खुदा करता है इश्क'मध्ये खरोखर परिसीमा दाखवणारा तारसप्तकातला पंचम आतड्यातून आलेला... गगन भेदून जाणारा. आयुष्यभर गाण्याला सर्वस्व मानणारा, धर्माच्या पलीकडे गेलेला हा बावनकशी कलाकार आणि माणूस, स्वत:च देवत्वाला पोचला हे नौशादमियांचे शब्द खरे ठरले. आणि रफीचे स्वर आजही आसमंतात आहेतच...! त्यांनीच म्हटल्याप्रमाणे,

दिल का सूना साज़ तराना ढूंढेगा,  
वक्त मेरे गीतों का खज़ाना ढूंढेगा  
मुझको मेरे बाद ज़माना ढूंढेगा!

कलेनं स्वत: ज्याला वरमाला घातली, तो कलाकार कधीच अस्तंगत होत नसतो!

♫

# १. ओ दूर के मुसाफिर

चले आज तुम जहाँ से, हुई ज़िंदगी परायी
तुम्हें मिल गया ठिकाना, हमें मौत भी न आयी
ओ दूर के मुसाफिर, हम को भी साथ ले ले रे!
हम को भी साथ ले ले, हम रह गए अकेले!

तू ने वो दे दिया ग़म बेमौत मर गए हम
दिल उठ गया जहाँ से, ले चल हमें यहाँ से
किस काम की ये दुनिया जो जिंदगी से खेले!

सूनी है दिल की राहें खामोश हैं निगाहें
नाकाम हसरतों का उठने को है जनाजा
चारों तरफ लगे हैं बर्बादियों के मेले!

---

चित्रपट : उडन खटोला (१९५५)
गीतकार : शकील बदायुनी
संगीतकार : नौशाद

---

ती निघाली, अनंताच्या प्रवासाला. कुणीच तिला रोखू शकत नाही या क्षणी. देशासाठी स्वत:च्या प्राणांची आहुती देण्याचा निर्धार तिच्या चेहऱ्यावर विलसतो आहे. असफल प्रेम इथेच सोडून निघाली ती. या जन्मी झालेली ताटातूट मृत्यूनंतर तरी संपेल, शरीरं अलग होऊ शकतात पण आत्म्याचं मीलन चिरंतन, अक्षय, अनंत आहे याचा तिला आतून ठाम विश्वास आहे. पण डोळ्यांपुढे तिला असं मृत्यूला कवटाळताना तो कसा बघू शकेल? टाहो फोडून, "एकटी

गायकाची 'उपज' असली पाहिजे.. आपल्याला मिळालेला अवकाश गायक कसा वापरतो, यातून त्याची बुद्धी आणि गाण्यातली समरसता दिसत असते. 'मर गए'वर हलकीशी जागा घेतली नसती, तर गाण्याची चाल फारशी बिघडली नसती; पण मग बेमौत मरण्याचं वैफल्य कसं दिसलं असतं? गायकाची बांधिलकी त्या मूळ भावनेशी आहे!



*नौशाद, रफी आणि शकील बदायुनी या त्रिकुटाने अनेक यादगार गाणी दिली...*

आता एक जीवघेणी जागा येते. 'दिल उठ गया' म्हणताना 'दिल'चा सूर असा लागतो, की आता आयुष्य म्हणजे भलंमोठं शून्य आहे, हेच सत्य क्रूरपणे आदळतं येऊन. 'ले चल हमें यहाँ से'वरचा कापरा आवाज कसा काळीज चिरत जातो! 'खेले' शब्दावरचा हुंदका आपल्यालाही रडायला लावतो. नाकाम हसरतों का जनाजा! फोल ठरलेल्या सगळ्या आशा-आकांक्षा. उद्ध्वस्त होण्याची जत्रा जणू! साहिर म्हणाले होते, 'बर्बादियों का जश्न।' इथे शकीलजी म्हणतात, 'बर्बादियों के मेले।' बघा, भाववृत्ती बदलली की संदर्भ कसे बदलतात! तिथेही रफी, इथेही रफी! पण आवाजाची फेक वेगळी आणि बरबादी शब्द कुठल्या संदर्भात आला, हे जाणून घेऊन केलेला उच्चारही निराळा!

आता शोकाकुल हाका अधिकच तीव्र होतात.. 'हमको भी साथ लेले, हम रह गए अकेले!' हे स्वर चढत जातात. अगदी वरच्या तार रिषभापर्यंत! आवाज किंचित थरथरतो! एकाच वेळी तिची कड्यावरून उडी आणि भावनांचा, शोकाचाही कडेलोट!

हा शेवट अक्षरश: अंगावर येतो. पुढे काही ऐकावं, बघावं हे धाडसच होत नाही. व्यापून उरतो तो रफीसाहेबांचा आवाज! त्या क्षणी तिचं बलिदान जेवढं मोलाचं, तेवढ्याच त्याच्या भावनाही! प्रेमाचं बांधलं जाणारं थडगं, स्वप्नांची राखरांगोळी यांना प्रतिष्ठा मिळवून देणारी, कळवळून न्याय मागणारी रफीसाहेबांची गायकी आहे! असा आवाज म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचंच एक रूप!

बशीर बद्र म्हणतात तसं,

खुदा की उस गले में अजीब कुदरत है
वो बोलता है तो एक रोशनीसी होती है!

♫

असेल त्यात? ही ताकद केवळ आवाजात असून चालत नाही, तर त्या गाण्यात काही क्षण स्वत:ला पूर्ण विसरावं लागतं! ती व्यथा, तो वियोग स्वत: पूर्ण जगावा लागतो; तेव्हा ऐकणाऱ्याच्या डोळ्यांत पाणी येतं, आणि हीच त्याची परतफेड असते. फार महाग असतात हे अश्रू! ज्या कलाकाराला लाभले, त्याच्या आयुष्याचं सोनं झालं. आणि रफीसाहेबांना ही श्रीमंती अतोनात लाभली! आणि त्यांच्या परीसस्पर्शानं अनेकांच्या सामान्य आयुष्यांना सोन्याची झळाळी मिळाली!

♫



*दिलीप कुमार यांचा आवाज हे रफींचं स्थान अढळ राहिलं...*


# मोहम्मद रफी : एक चित्रझलक




*पद्मश्री किताब स्वीकारल्यानंतर त्या वेळचे राष्ट्रपती डॉ. एस. राधाकृष्णन यांच्याशी बातचीत करताना मोहम्मद रफी*



*लता आणि रफी यांच्या आवाजातली अनेक युगलगीतं अजरामर झाली...*



*रफींच्या काळातले एक बडे चित्रपट निर्माते-दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांच्यासह संगीतकार नौशाद आणि रफी यांची गाण्यावर चर्चा*



*कुटुंबवत्सल पिता ही भूमिकाही जबाबदारीने निभावलेले रफीजी आपल्या अपत्यांसमवेत*



*ओ.पी.नय्यर म्हणजे ठेक्याची गाणी या लोकप्रिय गैरसमजाला छेद देणारं हे एक रसदार प्रेमगीत. रफीजी आणि नय्यर रेकॉर्डिंगमधल्या एका प्रसन्न क्षणी.*

डोळ्यांत हरवून जाऊ की केसांच्या जीवघेण्या बटांमध्ये गुंतू..? 'मुड़ी'नंतर एक अर्थपूर्ण पॉज येतो. हे नेमकं कुणासाठी गातोय तो? अमिता (माला सिन्हा)साठी की सुनीता (तनुजा)साठी, हा संभ्रम कायम ठेवण्यासाठी अंतऱ्यात तिसऱ्या ओळीत प्रत्येक वेळी पॉज आहेत. 'जिधर नजर मुड़ी' म्हणजे नेमकी कुठे, हा संभ्रम त्या पॉजमुळे अधिक ठळक होतो. 'सुरूर' शब्द बारकाईनं ऐकला, की रफीसाहेबांनी त्यात मिसळलेला एक उसासा ऐकू येतो.

रफीसाहेबांनी उच्चारलेल्या 'है बला की शोखियाँ'मध्ये कमालीची प्रमाथी धुंदी आहे. ओठांत बंदिस्त केलेल्या स्मितहास्यातही विजा चमकून जातायत! खुद्द मद्यालाच स्वत:ची नशा चढावी, तसं तुझं हे यौवन.. स्वत:च्याच धुंदीत आहे! काय सुरेख कल्पना आहे ही! 'शबाब आपका..' इथे पुन्हा तोच प्रश्नार्थक पॉज आहे. 'आपका' म्हणजे तनुजा की माला?

काही व्यक्तीच अशा असतात, की त्यांच्या अस्तित्वानं भवतालचं जग त्या सुंदर करत जातात.. त्यांचा स्वत:चाच एक 'नूर' असतो, प्रकाश असतो.. स्पंदनं असतात.. त्यांच्यामुळे आजूबाजूच्या वातावरणातल्या नकारात्मक लहरी विरून जातात! अशी आहेस तू! जिथे पाऊल ठेवशील, तिथली हवाच बदलेल.. आणि संपूर्ण निसर्ग जणू नखशिखांत तुझ्यात विरघळून जाईल!

'तुझ्यात ती कशिश आहे! एक चमक. एक ठिणगी.. एक असोशी, एक प्रकारचं तेज. एक उत्कटता!'